दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ८ वे | पाने ८ | मुल्य रू. ५.०० | अंक ८ | शनिवार १७ ऑक्टोबर २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

शिरूरमध्ये गोळीबाराने खळबळ...
वडिलांच्या मदतीला धावली १२ वर्षांची चिमुकली

शिरूर : शिरूर शहरातील आनंद सोसायटीत पहाटे बंदूकधारी चोरट्याने धुमाकूळ घालत उमेश छाजेड (वय ४२) यांच्या पायावर गोळी झाडली. या थरारात वडिलांच्या मदतीला धावलेल्या अवघ्या १२ वर्षांच्या मानवी छाजेड हिने दाखवलेल्या धैर्याची परिसरात चर्चा सुरू आहे.
शुक्रवारी (ता. १६) पहाटे अडीच वाजल्यापासून संशयित चोरटा सोसायटी परिसरात फिरत होता. पहाटे चारच्या सुमारास पाळीव कुत्र्याला फिरवून घरी परतलेल्या उमेश छाजेड यांना घरात चोरटा दिसला. त्यांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. वडील संकटात असल्याचे पाहून मानवीही चोरट्याला रोखण्यासाठी धावली. मात्र, प्रतिकारामुळे चोरट्याने पिस्तुलातून गोळी झाडली आणि अंधाराचा फायदा घेत पळ काढला. जखमी छाजेड यांच्यावर हार्दे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संशयित चोरीच्या मोटारसायकलवरून आल्याची माहिती असून, १५ ऑक्टोबर रोजी त्याने एका महिलेला पिस्तूल रोखून धमकावल्याचेही समोर आले आहे. सोसायटीतील सीसीटीव्हीमध्ये तो कैद झाला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले, पोलीस निरीक्षक विनोद पाटील आणि पथकाने घटनास्थळी धाव घेतली. आरोपीच्या शोधासाठी नाकाबंदी व शोधमोहीम सुरू आहे.

कोट्यवधींचा निधी वाहिला पण नळ कोरडेच!

'जलजीवन'चा हिशेब द्या; विखे पाटलांचा अधिकाऱ्यांना दम!

- कागदावर योजना पूर्ण, गावांत मात्र पाण्यासाठी वणवण!
- रखडलेल्या कामांची संयुक्त चौकशी होणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाला, कागदोपत्री पाणी योजनांची कामे पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले; मात्र ग्रामस्थांच्या घरातील नळ कोरडेच! श्रीरामपूर तालुक्यातील जलजीवन मिशनच्या विविध योजनांचा आढावा घेताना हे वास्तव समोर आल्याने पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील अवाक् झाले. सरकारी पैसा खर्च होऊनही नागरिकांना पाणी मिळत नसेल, तर या कामांचा उपयोग काय, असा सवाल उपस्थित करत त्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सर्व योजनांची संयुक्त चौकशी करण्याचे आदेश दिले. चौकशीत दोषी आढळणारे अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यासह बंद पडलेल्या योजना तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या टंचाई आढावा बैठकीत पाणी, वीज आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून प्रशासनाला धारेवर धरण्यात आले.

गावोगावी पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला असताना जलजीवन मिशनच्या योजना कागदावर पूर्ण आणि प्रत्यक्षात बंद असतील, तर हा केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा नाही, तर जनतेच्या पैशांचा हिशेब मागण्याची वेळ आहे! दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या श्रीरामपूर तालुक्यातील पाणीटंचाई, रखडलेल्या जलजीवन योजना, महावितरणचा भोंगळ कारभार आणि कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. 'टंचाईच्या काळात एकही लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहता कामा नये; हलगर्जीपणा करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल,' असा सज्जड इशारा त्यांनी दिला.

श्रीरामपूर येथे झालेल्या तालुकास्तरीय टंचाई आढावा बैठकीत ग्रामस्थांनी तक्रारींचा पाढाच वाचला. या बैठकीस आ हेमंत ओगले, माजी आम दार लहू कानडे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, भाजपा जिल्हा अध्यक्ष नितीन दिनकर, नगराध्यक्ष करण ससाणे, नगरसेवक शीनिवास बिहानी, संजय फंड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उप जिल्हाधिकारी शलेश हिंगे,


छाया : परेश कापसे

माजी सभापती दीपक पटारे, भाजपचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे यांच्यासह सर्व अधिकार, पदाधिकारी व कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

कोट्यवधी रुपये खर्च करूनही पाणीपुरवठा योजनांचा उपयोग होत नसेल, तर या कामांचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित झाला. माळवडगावच्या एक कोटी ७५ लाख रुपयांच्या जलजीवन योजनेपासून निपाणी-वडगावमधील योजनांपर्यंत अनेक ठिकाणच्या कामांबाबत तक्रारी करण्यात आल्या. अधिकारी मात्र ठेकेदारांकडे बोट दाखवून गप्प बसले. सुरुवातीला पाणीपुरवठा सुरू होऊन नंतर योजना बंद पडल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले. आता या चौकशीतून कोणाचे पितळ उघडे पडणार, याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, ग्रामसेवक, तलाठी आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांनी गावभेटींचे वेळापत्रक ग्राम पंचायत कार्यालयात प्रसिद्ध करावे, असे निर्देश देण्यात आले. वांगी, खिर्डी, टाकळीभान, उंदीरगाव, निमगाव, बेलापूर बुद्रुक, भोकर, पढेगाव, भेर्डापूर आणि कानेगावसह विविध गावांतील नागरिकांनी पाणी, वीज आणि विकासकामांबाबत तक्रारी मांडल्या. आता प्रश्न केवळ आदेश देण्याचा नाही, तर त्यांची अंमलबजावणी करण्याचा आहे.

जलजीवनच्या बंद योजना सुरू होणार का, दोषींवर कारवाई होणार का आणि टंचाईच्या काळात ग्रामस्थांना प्रत्यक्ष दिलासा मिळणार का, यावरच प्रशासनाच्या कार्यक्षमतेची खरी परीक्षा होणार आहे. एक महिन्यानंतर पुन्हा आलेल्या तक्रारी संदर्भात अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली याचा आढावा घेण्यात येणार असल्याचे विखे पाटील म्हणाले.

प्रवरा कालवा बंदिस्त होणार; ४५० कोटींचा

श्रीरामपूर शहरातून जाणारा प्रवरा कालवा बंदिस्त करण्याच्या कामासाठी ४५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती विखे पाटील यांनी दिली. कालव्यातील प्रदूषण रोखून स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. महाराष्ट्रातील अशा प्रकारचा पहिला प्रयोग श्रीरामपूरमध्ये राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन पुढील दहा महिन्यांच्या पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. गोदावरी खोऱ्यातील बंधारे भरणे आणि पाणीवाटपाचे नियोजन करण्यासाठी कालवा सल्लागार समितीची बैठकही घेण्यात येणार आहे.

११२ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा प्रश्न पेटला

टाकळीभान सेवा सोसायटीच्या कर्जमाफी प्रकरणात ११२ पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचा मुद्दा राजेंद्र कोकणे यांनी उपस्थित केला. या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संबंधित प्रशासकाविरोधात पोलिसांत फिर्याद देऊन गुन्हा दाखल करण्याचे आदेश विखे पाटील यांनी दिले. तालुक्यातील ४० हजार ५६२ एकर क्षेत्राचा पंचनामा पूर्ण झाला असून शेतकऱ्यांना अग्रीम मदत देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. गोदावरी ऊर्ध्व खोऱ्यातील पाणीपट्टी माफीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

महावितरणच्या कारभारावरही संताप

अनियमित वीजपुरवठ्यामुळे पाणीपुरवठा योजनांसह शेतीच्या कामांवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी मांडल्या. मुळा-प्रवरा परिसरातील अतिभारित रोहित्रे तातडीने बदलण्याचे आदेश देण्यात आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींबद्दल अधिकारी चालढकल करत असल्याचे पाहून पालकमंत्री विखे पाटील संतापले. पाणीपुरवठा विभाग आणि महावितरणने समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

तिरंगा यात्रेपूर्वी अभिजित दीपके पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कनॉट प्लेसमध्ये निर्बंधांचे कारण देत दिल्ली पोलिसांची कारवाई

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीतील कनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये तिरंगा यात्रा काढण्याची घोषणा करणारे कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) प्रमुख अभिजित दीपके यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. प्रस्तावित यात्रेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी त्यांना नोटीस बजावत लागू निर्बंधांचे उल्लंघन न करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, नवी दिल्ली नगरपालिका परिषदेनेही यात्रेला परवानगी नाकारली आहे.

दीपके यांनी शुक्रवारी तिरंगा यात्रा काढण्याची घोषणा केली होती. मात्र, कनॉट प्लेस आणि परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत निर्बंध लागू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. पूर्वपरवानगीशिवाय मोर्चा काढणे किंवा गर्दी जमविणे कायदेशीर कारवाईस पात्र ठरू शकते, असेही त्यांना सांगण्यात आले.

दीपके यांच्या निवासस्थानी पोहोचलेल्या पोलिसांनी त्यांना नोटीस बजावली. यावेळी नोटिसेतील भाषा आणि आरोपांवरून दीपके यांनी पोलिसांना जाब विचारला. नेमके कोणते आरोप आहेत (पान ४ वर)

माणुसकीच्या गावपणाला सलाम..!

बेलापूरकरांनी उचलली पाच लेकींच्या भविष्याची जबाबदारी; आठ दिवसांत दोन लाखांचा मदतनिधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



बेलापूर : वडिलांचे छत्र हरपले, कुटुंबाचा आधार निखळला; मात्र नियतीने दिलेल्या या दुःखद धक्क्यात पाच चिमुकल्या लेकी आणि त्यांच्या आईला एकाकी पडू न देता संपूर्ण गावच त्यांच्या पाठीशी उभे राहिले. संकटाच्या काळात माणुसकीचा हात किती मोठा आधार देऊ शकतो, याची हृदयस्पर्शी प्रचिती बेलापूर आणि ऐनतपूर ग्रामस्थांनी दिली आहे. 'देणाऱ्याचे हात हजारो' या उक्तीचा प्रत्यय देत ग्रामस्थांनी शेळके कुटुंबाच्या मदतीसाठी माणुसकीचे नवे पर्व सुरू केले.

बेलापूर येथील हॉटेलमध्ये स्वयंपाकाचे काम करणारे विजय बाळासाहेब शेळके यांचे हृदयविकाराच्या झटक्याने अचानक निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि पाच मुली असा परिवार आहे. घरातील कर्त्या व्यक्तीच्या निधनाने या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र, या कुटुंबाचे भविष्य अंधकारमय होऊ नये, यासाठी गावातील संवेदनशील नागरिक पुढे सरसावले.

अंत्यविधीच्या वेळी बाळासाहेब सरोदे यांनी पाच मुलींच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याची संकल्पना मांडली. शरद नवले, अभिषेक खंडागळे आणि शशीकांत थोरात यांनी त्यास तत्काळ प्रतिसाद दिला. ज्येष्ठ पत्रकार देविदास देसाई यांनी 'माझे गाव, माझी मदत' हा व्हॉट्सॲप समूह स्थापन करून मदतीचे आवाहन केले. त्यानंतर मदतीचा ओघ सुरू झाला आणि अवघ्या आठ दिवसांत दोन लाख रुपयांचा निधी जमा झाला.

या उपक्रमात केवळ आर्थिक मदतीपुरते योगदान मर्यादित राहिले नाही. साई इंग्लिश मीडियम स्कूलच्या पदाधिकाऱ्यांनी पाचही मुलींच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी स्वीकारली, तर बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांनी एका मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचे जाहीर केले. जनसेवा पतसंस्थेच्या वतीने दरमहा (पान ४ वर)

कर्जदारांकडून पैसे वसूल केले, पण बँकेत भरलेच नाहीत

बँकेच्या हप्त्यांवर ७.३१ लाखांचा डल्ला; एकाला अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : कर्जदारांकडून विश्वासाने वसूल केलेले हप्ते बँकेत जमा करण्याऐवजी परस्पर वापरल्याच्या आरोपाखाली कोटक महिंद्रा बँकेच्या अपहारप्रकरणातील फरार आरोपी सागर तुळशीराम शिंदे (रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) याला बेलवंडी पोलिसांनी अटक केली. या प्रकरणात एकूण ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांच्या अपहाराचा आरोप असून, आरोपी शिंदे याच्याशी संबंधित रक्कम ३ लाख ३८ हजार ७३० रुपये आहे. (पान ४ वर)



अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश; खा. नीलेश लंके यांनी व्यक्त केला आनंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



पारनेर : अहिल्यानगर येथे नव्याने मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचे प्रवेश पूर्ण होऊन महाविद्यालय प्रत्यक्ष सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. नीलेश लंके यांनी महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थी, अधिष्ठाता, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे, ही अनेक वर्षांपासूनची इच्छा पूर्ण झाल्याने मनस्वी आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान जिल्ह्यातील नागरिकांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी केली होती. त्यावेळी खासदार झाल्यानंतर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय आणण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार खासदार झाल्यानंतर या महाविद्यालयासाठी पाठपुरावा केला. खा. सुप्रिया सुळे यांनीही यासाठी सहकार्य केले. त्यातून महाविद्यालयाला मंजुरी मिळाली असून, आता पहिल्या तुकडीतील १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. लांब यांना विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील कामाचा अनुभव असून, त्यांनी नव्या संस्थेचे आव्हान स्वीकारले आहे. त्यांच्यासह प्राध्यापक आणि कर्मचारीवर्ग महाविद्यालयाच्या कामकाजासाठी कार्यरत आहे. या वेळी खा. लंके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कोटा येथील एक विद्यार्थी अहिल्यानगरमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी दाखल झाल्याचे समजल्यावर त्यांनी आनंद व्यक्त केला. आपल्या भागातील विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी बाहेर जात असताना अन्य भागांतील विद्यार्थी अहिल्यानगरमध्ये शिक्षणासाठी येणे ही अभिमानाची बाब (पान ४ वर)

शेतकऱ्यांची चेष्टा होणार नाही, 'एनडीआरएफ'कडूनही मदत मिळेल : बावनकुळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



अमरावती : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपये अग्रिम मदत देण्याच्या सरकारच्या घोषणेवर टीका केली जात आहे. यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वाचा खुलासा केला. ही अग्रिम मदत आहे. अंतिम मदत 'एनडीआरएफ'कडून मिळणार असून त्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ते आज (दि. १६ ऑक्टोबर) अमरावतीत पत्रकारांशी बोलत होते. पुढच्या काळामध्ये 'एनडीआरएफ'ला काही प्रस्ताव (पान ४ वर)


फुटवेअर दुकानातून गांजाची विक्री

२ किलो १६७ ग्रॅम गांजासह एक लाखाचा मुद्देमाल जप्त; एकाला अटक, दुसरा फरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा शहरातील गोदडे महाराज मठाजवळील साईसेवा फुटवेअर दुकानातून गांजाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने छापा टाकला. या कारवाईत सागर अविनाश बोराडे (वय ३४, रा. लोहार गल्ली, श्रीगोंदा) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २ किलो (पान ४ वर)







अमेरिका ही मित्र असू शकते; मालक नाही! गळाभेटीपलीकडे जाऊन भारताने राष्ट्रीय हिताचा हिशेब मांडण्याची वेळ

भारताला भागीदारी हवी, दादागिरी नव्हे!

माणसांच्या मैत्रीत जसे मतभेद होतात, तसेच देशांच्या संबंधांतही होतात. मात्र, माणसांच्या मैत्रीत भावना महत्त्वाच्या असल्या, तरी देशांच्या संबंधांत भावनांपेक्षा हितसंबंध मोठे असतात. आज अमेरिकेच्या बाबतीत भारताने हाच धडा पुन्हा शिकण्याची वेळ आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गळाभेटी, एकमेकांबद्दलचे कौतुक आणि मैत्रीचे दावे आपण अनेकदा पाहिले. पण आंतरराष्ट्रीय राजकारणात छायाचित्रांपेक्षा निर्णय महत्त्वाचे असतात. तिथे मैत्रीची भाषा बोलली जात असली, तरी व्यवहाराचा हिशेब मात्र आपल्या फायद्या-तोट्याचा पाहूनच मांडला जातो. त्यामुळे अमेरिकेशी मैत्री हवीच; पण ती भारताच्या स्वाभिमानाची किंमत मोजून नको!

शेक्सपिअरच्या नाटकांतूनही माणसांच्या नात्यांमधील बदलत्या स्वरूपाचे दर्शन घडते. ब्रिटनचे माजी परराष्ट्रमंत्री लॉर्ड पामर्स्टन यांनीही राष्ट्रांना कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, तर कायमस्वरूपी हितसंबंध असतात, हे स्पष्ट केले होते. या विचाराचा अर्थ साधा आहे. आज जो देश आपल्या सोबत आहे, तो उद्याही प्रत्येक प्रश्नावर आपल्या बाजूने उभा राहीलच, असे नाही. म्हणूनच देश चालवताना नेत्यांच्या वैयक्तिक जवळिकीपेक्षा देशाच्या दीर्घकालीन हिताला प्राधान्य द्यावे लागते. भारतानेही अमेरिकेबरोबरच्या संबंधांकडे याच नजरेतून पाहण्याची गरज आहे.

अमेरिकेत भारतीय वंशाच्या नागरिकांनी मोठे यश मिळवले आहे. उद्योग, विज्ञान, माहिती-तंत्रज्ञान, वैद्यकीय क्षेत्र आणि शिक्षण अशा अनेक क्षेत्रांत भारतीयांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च राजकीय वर्तुळातही भारतीय वंशाच्या व्यक्ती पोहोचल्या आहेत. तरीही भारतीय व्यावसायिकांना कमी लेखणारी विधाने केली जात असतील, तर त्यातून अमेरिकेतील बदलत्या राजकीय वातावरणाची जाणीव होते. भारतीय वंशाच्या पत्नी आणि मुलासह राहणाऱ्या अमेरिकी उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्याकडून भारतीय व्यावसायिकांविषयी अवमानकारक सूर उमटणे, ही बाबही त्याच पार्श्वभूमीवर पाहावी लागेल.

प्रश्न केवळ एखाद्या नेत्याच्या विधानाचा नाही. प्रश्न अमेरिकेच्या धोरणांचा आहे. भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अमेरिका आकर्षित करते; भारतीय तंत्रज्ञ तेथील उद्योगांना हातभार लावतात; भारतीय कंपन्या अमेरिकी अर्थव्यवस्थेत योगदान देतात. अशा वेळी व्हिसाचे नियम कठोर करणे, परदेशी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर अतिरिक्त आर्थिक भार टाकण्याचे प्रस्ताव मांडणे आणि स्थलांतरितांविरोधात आक्रमक भूमिका घेणे, याचा फटका भारतीयांनाही बसतो. अमेरिकेला स्वतःच्या नागरिकांचे हित जपण्याचा अधिकार आहे. पण त्या नावाखाली इतर देशांतील नागरिकांना लक्ष्य केले जात असेल, तर त्यावर प्रश्न विचारलेच पाहिजेत.

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या वाटाघाटींमध्ये कृषी आणि दुग्धव्यवसायाचा मुद्दा महत्त्वाचा आहे. अमेरिकेला भारतीय बाजारपेठेत अधिक प्रवेश हवा आहे. मात्र, भारतासाठी हा केवळ व्यापाराचा विषय नाही; तो कोट्यवधी शेतकरी आणि पशुपालकांच्या उपजीविकेचा प्रश्न आहे.

आपल्या देशात आजही मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कधी दुष्काळाशी, कधी अतिवृष्टीशी, तर कधी उत्पादनाला भाव न मिळण्याच्या संकटाशी झुंजतो आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यालाही चारा, पशुखाद्य, औषधे आणि मजुरीच्या वाढत्या खर्चाचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत परदेशी कृषी उत्पादनांसाठी बाजारपेठ मोठ्या प्रमाणात खुली केल्यास स्थानिक उत्पादकांसमोर आणखी मोठे आव्हान उभे राहू शकते.

अमेरिकेतील शेतीचे स्वरूप, उत्पादनक्षमता आणि सरकारी मदतीची पद्धत भारतापेक्षा वेगळी आहे. त्यामुळे दोन्ही देशांतील शेतकऱ्यांना समान परिस्थितीत स्पर्धा करता येईलच असे नाही. व्यापार करार झाला पाहिजे; पण त्यासाठी भारतीय शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा बळी देता कामा नये. देशाच्या अर्थव्यवस्थेला फायदा होत असताना गावातील शेतकरी मात्र तोट्यात जाणार असेल, तर अशा कराराचा फायदा नेमका कोणाला, हा प्रश्न विचारावाच लागेल.

भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवल्यामुळे अमेरिकेने व्यापारविषयक दबाव वाढवण्याची भूमिका घेतली आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे स्वतःचे धोरणात्मक हितसंबंध आहेत. परंतु भारतालाही आपल्या ऊर्जासुरक्षेचा विचार करावा लागतो. देशातील उद्योग, वाहतूक व्यवस्था आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर इंधनाच्या किमतींचा थेट परिणाम होतो. त्यामुळे तेल कुठून आणि कोणत्या किमतीत खरेदी करायचे, हा निर्णय भारताने आपल्या आर्थिक हिताचा विचार करून घेतला पाहिजे.

रशियाशी संबंध ठेवले म्हणून अमेरिका शत्रू ठरत नाही आणि अमेरिकेशी व्यापार केला म्हणून रशियाशी संबंध तोडण्याची गरजही नाही. भारताची परराष्ट्र नीती ही कोणत्याही एका देशाच्या मर्जीवर चालणारी नसावी. अमेरिका, रशिया, युरोप, आखाती देश आणि आशियातील इतर राष्ट्रांशी संबंध ठेवताना भारताने स्वतःचे हित केंद्रस्थानी ठेवले पाहिजे.

व्यापारातील मतभेदांचा वापर करून एखाद्या देशाला आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याला शांतपणे; पण ठामपणे उत्तर दिले पाहिजे. कारण आज तेलाच्या मुद्द्यावर दबाव येईल, उद्या संरक्षण खरेदीवर आणि परवा दुसऱ्याच विषयावर नवी अट घातली जाऊ शकते.

अमेरिकेला दोष देणे सोपे आहे; पण भारतानेही स्वतःच्या उणिवांकडे पाहिले पाहिजे. आपल्या देशातील तरुण शिक्षण आणि रोजगारासाठी परदेशात जाण्यास उत्सुक का आहेत? भारतीय विद्यापीठांमध्ये जागतिक दर्जाचे संशोधन आणि रोजगाराभिमुख शिक्षण पुरेशा प्रमाणात का उपलब्ध नाही? तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, औषधनिर्मिती आणि आधुनिक उद्योगांमध्ये तरुणांना देशातच मोठ्या संधी मिळाल्या, तर परदेशावरील अवलंबित्व कमी होऊ शकते.

भारतीय विद्यार्थ्यांनी परदेशात शिकू नये, असा याचा अर्थ नाही. जगातील ज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी त्यांना संधी मिळालीच पाहिजे. मात्र, आपल्या देशातील गुणवंत तरुणांना भारतातही तितक्याच चांगल्या संधी मिळणे आवश्यक आहे. परदेशात शिक्षण घेऊन भारतीय तरुणांनी पुन्हा आपल्या देशाच्या विकासात योगदान दिले, तर त्यातून देशाची ताकद वाढेल.

याचबरोबर भारताने निर्यात वाढवणे, उत्पादन क्षेत्र सक्षम करणे, संशोधनासाठी अधिक गुंतवणूक करणे आणि नव्या बाजारपेठा शोधणे गरजेचे आहे. एखाद्या देशाबरोबर व्यापारातील मतभेद निर्माण झाले, तर दुसरे पर्याय उपलब्ध असले पाहिजेत. पर्याय नसले की तडजोड करावी लागते; पर्याय असले की आत्मविश्वासाने बोलता येते.

भारताने अमेरिकेशी संबंध तोडावेत, अशी भूमिका व्यवहार्य नाही. संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान, शिक्षण आणि व्यापार या क्षेत्रांत दोन्ही देशांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. मात्र, सहकार्याच्या नावाखाली एकतर्फी अटी स्वीकारण्याची गरज नाही. अमेरिकेकडून संरक्षण साहित्य खरेदी करताना संयुक्त उत्पादन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणावर भर द्यावा. भारतीय उद्योगांना अमेरिकी बाजारपेठेत अधिक संधी मिळवून द्याव्यात. कृषी आणि दुग्धव्यवसायातील संवेदनशील बाबींवर ठाम भूमिका घ्यावी.

त्याचवेळी युरोपीय देश, ब्रिटन, आखाती राष्ट्रे आणि आग्नेय आशियातील देशांशी व्यापारसंबंध अधिक मजबूत केले पाहिजेत. भारताच्या आर्थिक ताकदीचा उपयोग केवळ मोठ्या बाजारपेठेच्या रूपात नव्हे, तर विश्वासार्ह भागीदार म्हणून झाला पाहिजे. शेवटी, आंतरराष्ट्रीय राजकारणात मैत्रीचे महत्त्व नाकारता येत नाही; पण मैत्री टिकवण्यासाठी स्वाभिमान गहाण ठेवावा लागत असेल, तर त्या नात्याचा फेरविचार करावा लागतो. अमेरिकेने भारताला आपला भागीदार मानावे, दबावाखाली निर्णय घेणारा देश नव्हे. आणि भारतानेही गळाभेटी, कौतुकाची भाषणे किंवा नेत्यांमधील वैयक्तिक जवळीक यांनाच राजनैतिक यश समजू नये. भारताला अमेरिकेशी वैर नको, पण वर्चस्वही नको. सहकार्य हवे, सौदेबाजी हवी; मात्र ती समानतेच्या पायावर! कारण भारताची मैत्री ही सन्मानाने मिळवायची गोष्ट आहे, दबावाखाली विकत घेण्याची नाही.

वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्या दंतचिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

११० नागरिकांची मोफत दंततपासणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी फॅक्टरी येथील वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोफत दंतचिकित्सा शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात जवळपास ११० नागरिकांनी



दातांची तपासणी करून घेतली. योगभवन येथे प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी तसेच ग्रामीण दंत महाविद्यालय, लोणी यांच्या सहकार्याने या मोफत दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन माजी आमदार चंद्रशेखर कदम यांच्या हस्ते करण्यात आले. नवरात्र उत्सवाच्या माध्यमातून केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आरोग्याची काळजी घेणारे उपक्रम राबविण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे माजी आ.चंद्रशेखर कदम म्हणाले.

यावेळी देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष गोरख काका मुसमाडे, माजी उपनगराध्यक्ष मुरलीधर कदम, मच्छिंद्र कदम, नगरसेवक वसंत कदम, वैभव गाडे, शरद खांदे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय विटनोर, उपाध्यक्ष अमोल वाळुंज, जालिंदर दोंड, अमोल कदम, मनोज कदम, रोहित शिंदे, मनोज गावडे, सुजित सिणारे, हेमंत कदम,रोहित सिनारे, महेंद्र दोंड, मयूर मोरे, विजय मोरे, सचिन कदम, प्रसाद कदम यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.यावेळी डॉ प्रशांत विरगी,डॉ मानस वाजपेयी,डॉ अंजुम फारुकी,डॉ स्नेहल गाडेकर,डॉ समृद्धी शिंदे, राजेंद्र मगर इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तपासणी केली.

मध्य वस्तीतील गणेश सॉ मिल हटविण्याची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी तालुक्यातील वांबोरी गावात मध्यवर्ती भागात खानापुरे यांच्या मालकीची 'गणेश सॉ मिल' ही लाकूड वखार असून वखारीला खेटूनच घरे आणि मानवी वस्ती आहे. त्यामुळे लाकडाच्या साठ्यामुळे संभाव्य अग्निधोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित प्रशासनाने कोणत्याही दुर्घटनेची वाट न पाहता वखारीची तातडीने पाहणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

लाकूड व लाकडी भुसा ज्वलनशील असल्याने वखारीतील अग्निसुरक्षा व्यवस्था, विद्युत यंत्रणा आणि लाकडाच्या साठवणुकीची पद्धत तपासणे आवश्यक आहे. तसेच, वखारीतील लाकडाच्या साठ्याचा स्रोत आणि आवश्यक कागदपत्रांची वन विभागाने पडताळणी करावी. परिसरात अवैध वृक्षतोड होत असल्यास ती रोखण्यासाठी विशेष लक्ष देऊन, नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. ग्रामपंचायत, वनविभाग आणि अग्निशमन विभागाने संयुक्त पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. गंभीर सुरक्षा त्रुटी आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी.

तसेच वखार गावाबाहेर स्थलांतरित करण्याच्या मागणीचाही प्रशासनाने विचार करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. संभाव्य दुर्घटना टाळणे, अवैध वृक्षतोडीला आळा घालणे आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.



पुस्तकांच्या दानातून वाचन संस्कृतीला बळ

घोडेगाव विद्यालयात ग्रंथालय सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानाच्या नव्या वाटा खुल्या व्हाव्यात, या उद्देशाने घोडेगाव येथील श्री घोडेश्वरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ग्रंथालय व वाचनालय सुरू करण्यात आले. विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा पत्रकार दिलीप शिंदे यांच्या हस्ते १३ ऑक्टोबर रोजी ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी स्वतः अनेक वर्षे जपून ठेवलेली विविध विषयांवरील सुमारे १२०० पुस्तके विद्यालयाला भेट दिली.

जागेअभावी स्वतःकडील पुस्तके आवरण्याची वेळ आल्यानंतर ही ग्रंथसंपदा रद्दीत देण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या उपयोगी यावी, असा विचार शिंदे यांनी केला. त्यातूनच त्यांनी पुस्तके विद्यालयाला भेट देण्याचा निर्णय घेतला. शाळेशी असलेले ऋणानुबंध जपत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. या ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची संधी मिळणार असून, त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण होण्यास मदत होणार आहे.

यावेळी माजी उपसभापती दिलीपराव लोखंडे पाटील, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब पाटील सोनवणे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुरेश सोनवणे, प्राचार्य बाबासाहेब खेमनर, समन्वयक प्रा. दादासाहेब कदम, ग्रंथपाल अनिता म्हस्के यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

भोजापूर चारीच्या प्रश्नावर दिवाळीपूर्वी बैठक घेणार

आ. अमोल खताळ यांची माहिती; तळेगाव दिघे येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन

संगमनेर, भोजापूर चारीच्या पाण्याच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी दिवाळीपूर्वी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमवेत भोजापूर कृती समितीच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात येईल. या बैठकीत शेतकऱ्यांच्या सूचना ऐकून घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली. तळेगाव दिघे येथे शिवसेना



शाखेचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, उपसरपंच मयूर दिघे, शाखाप्रमुख शिवाजी दिघे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले, भोजापूर चारीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यापूर्वी या प्रश्नावर राजकारण झाले; मात्र शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविताना अनेक अडचणी येतात. मागील वर्षी चांगला पाऊस झाल्याने चारीतून सुमारे ७२ दिवस पाणी सुरू ठेवता आले. यंदा पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीत पाण्याचे नियोजन महत्त्वाचे आहे. चारीच्या कामासाठी यापूर्वी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, रुंदीकरणासह आवश्यक कामांबाबत स्थानिक शेतकऱ्यांच्या सूचनांचाही विचार व्हावा, यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातून भैय्या मुनीर शेख यांना संधी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : येथील शिक्षक भैय्या मुनीर शेख यांनी राष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाड प्रशिक्षणात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशभरातील १,७६० अर्जांमधून ४५ शिक्षकांची निवड झाली असून महाराष्ट्रातून प्रा. भैय्या मुनीर शेख यांना संधी मिळाली आहे.

राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या जीवशास्त्र ऑलिम्पियाड परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांची क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने मुंबई येथे ६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पाच दिवसीय विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.या प्रशिक्षणासाठी देशभरातून १,७६० शिक्षकांनी अर्ज केले होते. त्यात छाननी प्रक्रियेनंतर केवळ ४५ शिक्षकांची निवड करण्यात आली. या निवडक शिक्षकांमध्ये महाराष्ट्रातून निवड झालेल्या शिक्षकांपैकी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, टाकेद बु., ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील जीवशास्त्र विषयाचे शिक्षक भैय्या मुनीर शेख यांचा समावेश होता. त्यांनी या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय प्रशिक्षणात सक्रिय सहभाग नोंदवून ते यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यांच्या या निवडीमुळे नेवासा भागांतील शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.प्रा. शेख यांची राष्ट्रीय स्तरावरील कामगिरीबद्दल भारत सर्व सेवा संघाचे अध्यक्ष राजेंद्र नळगे, सचिव प्रकाश जाधव, शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक तुवर, शाळेचे प्राचार्य एस.एच. पाटील, उपप्राचार्य ए.डी.म्हस्के तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखाधिकारीपदी खुशाल शिंगणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



पुणतांबा : येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्या शाखाधिकारीपदी खुशाल शिंगणे यांनी, तर अधिकारी म्हणून दीपक चव्हाण यांनी पदभार स्वीकारला.

यापूर्वीचे शाखाधिकारी रवींद्र तनपुरे यांच्या बदलीनिमित्त निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याउलट नवीन अधिकारी रुजू होताना कोणताही औपचारिक संदेश किंवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला नव्हता. तरीही काही नागरिकांनी बँकेत जाऊन नवीन अधिकाऱ्यांचे स्वागत केले. दरम्यान, अधिकारी बदलले तरी बँकेचे कामकाज नियमांनुसारच चालते. त्यामुळे अधिकारी येतात आणि जातात, यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत होणे महत्त्वाचे आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष गणेश जाधव यांनी व्यक्त केली.

काचोळे विद्यालयाच्या क्रिकेट संघाची जिल्हास्तरावर निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर, : रयत शिक्षण संस्थेच्या डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयाच्या १४ वर्षांखालील क्रिकेट संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. याशिवाय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत जिल्हा व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि रामराव आदिक पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत काचोळे विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रथम क्रमांक पटकावला. संघात निल देठे, सार्थक पतंगे, साईराज कदम, शिवम उघडे, शिवम कर्डिले,



साईराज कांबळे, लोकेश बडदे, हन्नान मिर्झा, श्रेयस गाडेकर यांच्यासह १६ खेळाडूंचा समावेश आहे.

विद्यालयाच्या श्रेयस सोनवणे व आस्था भरींडवाल यांनी स्क्रॉशमध्ये राज्यस्तरावर सहभाग घेतला. साईराज कदमने तिरंदाजीत जिल्हास्तरावर द्वितीय, तर साईराज वाडनकरने बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. कुस्ती, तायक्वांदो, धावणे, लांब उडी, उंच उडी आणि सांघिक खेळांतही विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले.

ओम शांती केंद्रातून मन-बुद्धीची शुद्धता साधता येते : रामदास गोल्हार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात मनःशांती, सकारात्मक विचार आणि आत्मिक समाधान मिळविण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. ओम शांती केंद्राच्या माध्यमातून अनेकांना जीवनाचा योग्य मार्ग मिळत असून, राजयोगामुळे मनाची एकाग्रता आणि मन-बुद्धीची शुद्धता साधता येते,



असे प्रतिपादन शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अहिल्यानगर जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार यांनी केले.

नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय परिसरातील ओम शांतीनगर येथे असलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयास रामदास गोल्हार व विजयाताई गोल्हार यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शिवबाबांच्या अधिष्ठानाचे दर्शन घेतले. केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी सरला दीदी व राजयोगिनी वंदना दीदी यांनी त्यांचे स्वागत केले. पत्रकार बाळासाहेब देवखिळे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी गोल्हार यांनी आध्यात्मिक मार्गदर्शन, राजयोग आणि सकारात्मक विचारांमुळे व्यक्तीच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडतो, असे सांगितले. तसेच प्रत्येकाने माउंट अबू येथील ब्रह्माकुमारी मुख्यालयाला एकदा तरी भेट द्यावी, असे आवाहन करून या भेटीसाठी प्रवासाची व्यवस्था करण्यास पुढाकार घेण्याची ग्वाही दिली.

या प्रसंगी समृद्धी दीदी, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र गाडेकर, वसंतराव मुंगसे, अभियंता प्रशांत गोल्हार, रेवन्नाथ शेळके, मच्छिंद्र देठे, दीपली शिरसाठ, मनीषा पिंपळे यांच्यासह केंद्रातील अनेक भाऊ-बहिणी उपस्थित होते.

जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत गोगलगावच्या मुलींची चमकदार कामगिरी!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : जिद्द, चिकाटी आणि सांघिक खेळाच्या जोरावर जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत खासदार बाळासाहेब विखे पाटील विद्यालय, गोगलगाव येथील १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. या संघाने सलग दुसऱ्या वर्षी जिल्हास्तरावर उपविजेतेपद मिळवून राहाता तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. विशेष म्हणजे, संघातील कर्णधार आसावरी खाडे, आदिती देवकर आणि अस्मिता माघाडे या तीन खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या



अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने नेवासा येथील सेंट मेरीज स्कूलमध्ये जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत गोगलगाव विद्यालयाच्या मुलींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली. तालुकास्तरीय स्पर्धेत विजयाची हॅटट्रिक साधल्यानंतर जिल्हास्तरावर राहाता तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मान या संघाने मिळविला.राहुरी आणि नेवासा संघांवर मात जिल्हास्तरीय स्पर्धेत राहाता संघाने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व सिद्ध केले. राहुरी संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात २५-१२ आणि २५-१४ अशा सलग दोन सेटमध्ये विजय मिळवत संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यानंतर बलाढ्य मानल्या जाणाऱ्या नेवासा संघाला २५-२३ आणि २५-२३ अशा गुणांनी पराभूत करत अंतिम फेरी गाठली. दोन्ही सामन्यांत खेळाडूंनी दाखवलेली एकाग्रता, अचूक चेंडूफेक आणि सांघिक समन्वय विशेष उल्लेखनीय ठरला. अंतिम सामन्यात अटीतटीची लढत गतवर्षीचा विजेता कोपरगाव आणि उपविजेता राहाता या दोन संघांमध्ये अंतिम सामना रंगला. अत्यंत चुरशीच्या या लढतीत दोन्ही संघांनी विजयासाठी शर्थीचे प्रयत्न केले.तीन खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड केली आहे. या संघात कर्णधार आसावरी खाडे, आदिती देवकर, अस्मिता माघाडे, श्रुती चौधरी, तनुजा खाडे, मनस्वी सातकर, अयोध्या मगर, श्रद्धा कांदळकर, स्वीकृती पडवळ, जयश्री सातपुते आणि आरोही मगर या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यापैकी कर्णधार आसावरी खाडे, आदिती देवकर आणि अस्मिता माघाडे यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.संघाला क्रीडाशिक्षक सुनील चोळके आणि प्रतिक गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

गीतांजली व्यवहारे हिचे वक्तृत्व स्पर्धेत दुहेरी यश



श्रीरामपूर : श्रीरामपूर येथील डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी गीतांजली शितल शरद व्यवहारे हिने सेवा संकल्प अभियानांतर्गत पंचायत समिती श्रीरामपूर येथे पार पडलेल्या वकृत्व स्पर्धेत व नगरपालिका श्रीरामपूर अंतर्गत संपन्न झालेल्या वकृत्व स्पर्धेत प्रथम क'मांक पटकवत दुहेरी यश संपादन केले. 'माझ्या स्वप्नातील भारत' या विषयावर तिने इंग्रजी भाषेत मनोगत व्यक्त केले. ग्रामीण व शहरी भागात प्रथम क्रमांक पटकावून आपल्या वकृत्व कौशल्याचा ठसा उमटवला. गीतांजली हिस सुनील खाडे व निरंजनी भुजबळ या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. पंचायत समिती शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख शितल गायकवाड यांची गीतांजली ही कन्या आहे.

पायरेन्सच्या कीर्ती गितेची आंतरविभागीय स्तरावरील व्हॉलीबॉल संघात निवड



प्रवरानगर : पायरेन्स इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड डमिनिस्ट्रेशन, लोणी येथील एमबीएची विद्यार्थिनी कु. कीर्ती संभाजी गिते हिची अहिल्यानगर विभागाच्या आंतरविभागीय स्तरावरील व्हॉलीबॉल संघात निवड झाली आहे. या निवडीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी प्रेरणा मिळाली असून, संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळणे महत्त्वाचे असते. अशा संधींचा लाभ घेत कीर्ती गिते हिने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर विभागीय संघात स्थान मिळविले आहे. तिच्या या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या उपक्रमांना विशेष महत्त्व आहे.

पोहेगाव महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



कोपरगाव : हिंदूहृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पोहेगाव येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाचा विस्तार व्हावा आणि पुस्तकांच्या माध्यमातून विचारांना चालना मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुस्तक प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील पुस्तके पाहण्याची आणि त्यांचे महत्त्व जाणून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोसावी वी.टी.यांनी केले. त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत वाचनाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील पुस्तकांची भूमिका स्पष्ट केली.

शेतकऱ्यांच्या मदतीच्या सर्व अपेक्षा सरकार पूर्ण करेल : ना. विखे पाटील

दुष्काळी परिस्थितीचा आढावा; पाणी, चारा आणि वीज नियोजनावर भर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याचे नियोजन सुरू आहे. शेतकऱ्यांच्या मदतीच्या सर्व अपेक्षा सरकार पूर्ण करेल. महायुतीचे सरकार हे देणारे सरकार आहे. मात्र, शेतकऱ्यांनीही खर्चावर बंधने आणावीत, असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



राहाता तालुक्यातील टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी हिताचे संवेदनशील निर्णय घेत आहेत. शेतकऱ्यांना तातडीची पाच हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली असून, ही मदत अंतिम नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून आणखी मदतीचे नियोजन सुरू आहे. दुष्काळ जाहीर होण्यापूर्वीच सरकारने ३७ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली असून, थकीत वीजबिल आणि विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्यासारखे निर्णयही घेतले आहेत.

तालुक्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेताना त्यांनी पाणी, वीज आणि चारा नियोजनावर विशेष भर दिला. पाणी उपलब्ध असतानाही वीज समस्येमुळे ते शेतकऱ्यांना मिळत नसेल, तर भारनियमनाबाबत संवेदनशीलतेने निर्णय घ्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले. भविष्यातील गरज लक्षात घेऊन चारा उत्पादन वाढविण्यासाठी कृषी व पशुसंवर्धन विभागाने समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले. अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी तालुक्याला ७२ कोटी रुपये, तर कृषी यांत्रिकीकरणाच्या अनुदानापोटी ४४ कोटी रुपये मिळाले आहेत. केवायसीच्या अडचणींमुळे अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. जलजीवन मिशनच्या योजनांबाबतच्या तक्रारींचेही तातडीने निराकरण करावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

गोदावरी, भंडारदरा आणि निळवंडे धरणांतील पाण्याचा जपून वापर करून पुढील दहा महिन्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन करावे. कालवे व चाऱ्या अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या दुरुस्तीकडे लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले. पश्चिमवाहिनी नद्यांचे ७८ टीएमसी पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्याच्या फेरसर्वे क्षणासाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राहाता पंचायत समितीला राज्यस्तरावर मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांनी अधिकारी, कर्मचारी व सरपंचांचे अभिनंदन केले.

संगमनेर तालुक्यात पशुधन सर्वेक्षणाला वेग झरेकाठीसह १२ गावांत माहिती संकलन सुरू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी, हंगेवाडी, खळी, चणेगाव, प्रतापूर, आश्वी खुर्द, शेडगाव, उंबरी बाळापूर, दाढ खुर्द, पिंपरी लौकी, अजमपूर आणि पानोडी या गावांमध्ये पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने पशुधन सर्वे क्षणाचे काम वेगाने सुरू आहे. या सर्वेक्षणांतर्गत पशुवैद्यकीय कर्मचारी प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन पशुपालकांकडून माहिती संकलित करीत आहेत.

सर्वेक्षणामध्ये गावातील पशुधनाची संख्या, जनावरांच्या विविध प्रजाती, पशुपालनाची सद्यस्थिती, चारा पिकांची उपलब्धता व लागवड यासह पशुधनाशी संबंधित विविध बाबींची नोंद केली जात आहे. या माहितीमुळे गावनिहाय पशुधनाची अचूक संख्या समजण्यास मदत होणार असून, भविष्यात पशुवैद्यकीय सेवा, लसीकरण, चारा नियोजन आणि शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्याचा उपयोग होणार आहे.

सर्वेक्षणाचे काम अचूक व वेळेत पूर्ण करण्यासाठी पशुवैद्यकीय यंत्रणा प्रयत्नशील आहे. पशुपालकांनी सर्वे क्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या पशुधनाची योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, संगमनेरचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. खंडेराव, डॉ. नागरगोजे, डॉ. गागरे, डॉ. बाळासाहेब शेळके, डॉ. रंगनाथ गिते, डॉ. प्रदीप वाणी, डॉ. निलेश कुटे यांच्यासह पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी पशुपालक शेतकरी बाळासाहेब डोळे उपस्थित होते.

पुणे विभागीय फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचा डंका!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी : क्रीडा क्षेत्रातील दमदार कामगिरीची परंपरा कायम राखत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूलच्या १४ वर्षांखालील मुलांच्या फुटबॉल संघाने पुणे विभागस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात पुणे शहराच्या संघाचा ५-४ गोलने पराभव करत प्रवरेच्या युवा खेळाडूंनी आपल्या कौशल्याची, जिद्दीची आणि सांघिक एकजुटीची प्रभावी छाप उमटवली. आता या संघाची राज्यपातळीवर निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगर येथे १४ व १९ वर्षांखालील मुलांच्या पुणे विभागस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रवरा एज्युकेशन सोसायटीचे क्रीडा संचालक रमेश दळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत पुणे विभागातील सात संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेदरम्यान प्रवरा पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी अचूक पासिंग, आक्रमक चाली, भक्कम बचाव आणि उत्कृष्ट गोलरक्षणाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांसमोर कडवे आव्हान उभे केले. अंतिम सामन्यातही खेळाडूंनी शेवटपर्यंत जिद्द कायम राखत ५-४ गोलने विजय मिळविला आणि विभागीय विजेतेपदावर आपली मोहोर उमटवली.

या यशामध्ये जयवर्धन माने-देशमुख, जतीन गायकवाड आणि ओमकार कांमडी या खेळाडूंनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. खेळाडूंची मेहनत, शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना यांमुळे प्रवरा पब्लिक स्कूलच्या क्रीडा यशात आणखी एका मानाच्या तुऱ्याची भर पडली आहे.शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे, मुख्याध्यापिका सौ. एम. एस. जगधने आणि प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. एस. आर. रत्नपारखी, शाळेचे क्रीडा संचालक अफजल पटेल, क्रीडा शिक्षक दीपक जाधव आणि फुटबॉल प्रशिक्षक अतुल डे यांचे मार्गदर्शन लाभले.

कांगोणीत आजपासून शक्ती व भक्तीचा उत्सव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : शारदीय नवरात्र उत्साह निमित्त महिलांसाठी कांगोणी येथील तुळजाभवानी माता प्रांगणात आजपासून १७ ते १९ तारखेपर्यंत भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. काल आरतीचा मान ज्ञानदेव कोकाटे, संजय सोनवणे, शरद बोरुडे रवींद्र दहितूले, कडुभाऊ कोकाटे, गोरख ठोंबळ यांना सप्तानिक मान मिळाला. तुळजा भवानी देवस्थान समिती आयोजित व विविध समाजाच्या मंडळ व प्रतिष्ठानच्या विशेष सहकार्यान शारदीय नवरात्र उत्साह उपक्रम निमित्ताने महिलांसाठी स्पर्धात्मक खेळ व सोबत आकर्षक बक्षीशांची जिंकण्याची, व विद्यार्थ्यांना वस्तूचे वाटप, गोरगरीब, निराधार, जेष्ठ नागरिक, माजी सैनिक अंगणवाडी सेविका मदतनीस,अशासेविका व बचत गटातील महिलांना सन्मानित, रोख बक्षीस,सहभागी व विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्याना सन्मानित करून लाडक्या बहिणाना भाऊबीज निमित्त साडीचे वाटप, या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रम १७ ऑक्टोंबर ते १९ ऑक्टोंबर या कालावधीत विविध स्पर्धा मालिकेत विजयी होणाऱ्या महिलांना मानाच्या पैठणी तसेच विविध बक्षिसांचे वितरण होणार आहे. यामध्ये निंबू चमचा, मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, होम मिनिस्टर, उखाणे, आकर्षक वेशभूषा, नृत्य आदी समावेश असून मोठ्या उत्साहात नवरात्र उत्सव पार पडणार आहे. तरी भाविकांनी या आनंदाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

रेणुकादेवी मंदिरात संबळच्या निनादात रंगला गोंधळ



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : शारदीय नवरात्र महोत्सव पर्वकाल परंपरेनुसार वडाळा महादेव येथील रेणुका देवी मंदिरात संबळाच्या निनादत सकाळच्या आरतीला आई जगदंबेचा गोंधळ रंगला. नवरात्रच्या आरती वर्णन केल्याप्रमाणे षष्टीचे दिवशी भक्त आनंद वर्तला हो घेऊन दिवट्या हाती हर्षे गोंधळ घातला हो या नुसार आश्रमाच्या मुख्य विश्वस्त नलिनीदेवी आईसाहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आदिशक्ती ऊपासिका आदिती जोशी जोशी यांनी देवीचे भळंद खेळविले.

त्यांना संबळावर आदित्य जोशी यांनी साथ दिली. पूजेचे पौरोहित्य ओंकार गुरूजी कुलकर्णी यांनी केले सौ व श्री कैलास अनारसे आरतीचे यजमान होते. मंगेश भालेराव तसेच सौ व श्री प्रशांत कुलकर्णी यांनी जोगवा मागितला. देवीच्या पदांचे गायन व संयोजन विश्वस्त आदिनाथ जोशी यांनी केले यावेळी पंचक्रोशीतील महिला भाविकांची मोठी उपस्थिती होती पत्रकार राजेंद्र देसाई व पंढरीनाथ राऊत यांनी प्रसाद वाटप नियोजन केले.

यंदा नवरात्र ऊत्सवावर दुष्काळाचे सावट आहे त्यामुळे पर्जन्य वृष्टीसाठी भाविकांना वरूणदेवा ऊपासना देण्यात आली तसेच पावसासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

माजी केंद्रीय मंत्री कराड व राजेंद्र साबळे यांची देवगडला भेट



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड व मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी राजेंद्र साबळे यांनी गुरुवारी नेवासा तालुक्यातील गुरूदेव दत्त पीठ असलेल्या देवगडला भेट देऊन भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

यावेळी देवगड संस्थानचे प्रमुख राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांचे दर्शन घेऊन त्यांनी संतपूजन केले.

उपस्थित मान्यवरांनी भगवान दत्तात्रय, श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा समाधी मंदिर व परिसरातील इतर देवतांचे दर्शन घेतले.यावेळी देवस्थानच्या वतीने परमपूज्य भास्करगिरी महाराजांनी डॉ. भागवत कराड, राजेंद्र साबळे पाटील आणि माजी महापौर बापू घडामोडे यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी अवधूत महाराज, संतसेवेकरी बजरंग विधाते, संदेश काळे, बाळू महाराज कानडे, नामदेव महाराज कंधारकर, सरपंच अजय साबळे, महेंद्र फलटणे, यश देवकर यांच्यासह अनेक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेवासा फाटा-कुकाणा रस्त्याची दुरावस्था

खड्डे बुजवणार की साडी-चोळी-बांगड्या स्वीकारणार?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा फाटा-भानसहिवरे-नागापूर-सौंदाळा-भेंडा मार्गे कुकाणा या महत्त्वाच्या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्याच्या साईडपट्ट्याही खचल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत, अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाला साडी-चोळी-बांगड्या भेट देऊन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जीवन ज्योत फाऊंडेशनने दिला आहे. नेवासा, भेंडा, कुकाणा आणि शेवगाव या महत्त्वाच्या बाजारपेठांना जोडणाऱ्या या रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. आठवडी बाजाराच्या दिवशी वाहनांची वर्दळ वाढते.

रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वारांसह वाहनचालकांना अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. रस्त्याच्या कडेला काही ठिकाणी एक ते दोन फूट खोल खड्डे पडले असून, साईडपट्ट्या खचल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेकदा निवेदने देऊनही संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप फाऊंडेशनने केला आहे. प्रशासनाने नागरिकांच्या जीवाशी खेळ न करता तातडीने रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि साईडपट्ट्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा फाऊंडेशनने दिला आहे. निवेदनावर कमलेश नवले पाटील, अक्षय बोधक, आप्पासाहेब आरगडे, नरेंद्र नवथर आणि राहुल कांगुणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

खेडा खरेदी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट

बाजार समितीतच सोयाबीन विक्री करा । अवैध व्यापाऱ्यांवर कारवाईसाठी फिरते पथक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : खेडा खरेदी व्यापाऱ्यांकडून होणारी आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी आणि सोयाबीन व मका या शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांनी आपला शेतमाल कोपरगाव बाजार समितीच्या आवारातच विक्रीस आणावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती साहेबराव किसनराव रोहोम यांनी केले आहे.

कोपरगाव तालुक्यात काही खासगी व्यापारी बाजार समितीचा परवाना न घेता गावोगावी काटे उभारून शेतकऱ्यांकडून शेतीमालाची खरेदी करत आहेत. शेतमालाला जादा भाव देण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींचा फायदा घेतला जात असल्याचे बाजार समितीच्या निदर्शनास आले आहे.

आर्द्रता मोजणाऱ्या यंत्रात हातचलाखी करून वाळलेल्या सोयाबीनची आर्द्रता जास्त दाखविणे, प्रतवारी कमी असल्याचे भासविणे तसेच इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यात फेरफार करून वजनात दोन ते पाच किलोपर्यंत घट दाखविण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

यंदा कमी पावसामुळे सोयाबीन व मका पिकांच्या उत्पादनात घट झाली आहे. सध्या पिकांची काढणी सुरू असून मजुरी देण्यासाठी तसेच रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीची तयारी करण्यासाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत खासगी व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या फसवणुकीमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या प्रकारांना आळा घालण्यासाठी कोपरगाव बाजार समितीने फिरते पथक नियुक्त केले असून, परवान्याशिवाय खरेदी करणाऱ्या तसेच शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

बाजार समितीच्या आवारात सर्व धान्याचे उघड लिलाव पद्धतीने व्यवहार होत असल्याने शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्याची संधी आहे. हमाली व तोलाई वगळता शेतकऱ्यांच्या हिशेबपट्टीत अन्य कोणतीही कपात केली जात नसून, विकलेल्या मालाच्या पैशांची हमीही मिळते.

त्यामुळे शेतकऱ्यांनी बाजार समितीतच सोयाबीन व अन्य भुसार माल विक्रीस आणावा. तसेच माल विकल्यानंतर हिशेबपट्टीची प्रत आवर्जून घ्यावी, असे आवाहन सभापती रोहोम, सचिव एन. एस. रणशूर व संचालक मंडळाने केले आहे.

जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२७८/२०२६
नेवासा दिनांक ३०/०९/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- संगीता प्रभाकर जोशी रा. देवगाव ता.नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. संगीता प्रभाकर जोशी रा. देवगाव ता.नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.- १, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-संगीता प्रभाकर जोशी,

गावाचे नाव-देवगाव, जन्म दिनांक-११/११/१९७१

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नेवासा

प्रतिज्ञापत्र

वारस नोंद मिळण्यासाठी

दिनांक, २२/०९/२०२६

मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी साहेब राहुरी यांचे समोर

श्रीमती सत्यभामा रमेश धनवटे वय. ५६ रा, वांबोरी ता, राहुरी जि, आहील्यानगर

सत्यं प्रतिज्ञेवर लिहून देते कि मी वरील गावची रहिवाशी असून माझे पती कै. रमेश दादा धनवटे हे दि, १९/०३/२०२३ रोजी वांबोरी ता, राहुरी जि, आहील्यानगर येथे मयत झाले असून त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

१)श्रीमती सत्यभामा रमेश धनवटे वय ५६ वर्षे पत्नी

२) श्री अनिल रमेश धनवटे वय ४० वर्षे, मुलगा

वरील प्रमाणे आम्ही सर्व वारस असून या वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही सदरचे प्रतिज्ञापत्र शासकीय कामे वारस दाखला मिळणे कामी लिहून देत आहे.

मी या प्रतिज्ञापत्रात दिलेली माहिती ही खरी व बरोबर असून ती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास मी भारतीय न्याय सहित २०२३ च्या कायद्याच्या कलम २३६ मधील तरतुदीनुसार २३७,(२)२२९ नुसार दंडास पात्र राहील कलम शिक्षेस व दंडानुसार शिक्षेस व दंडास पात्र राहिल्याची जाणीव आहे.

दिनांक २२/०९/२०२६

शिक्का

प्रतिज्ञापत्र करणाऱ्याची सही
श्रीमती सत्यभामा रमेश धनवटे.
गाव, वांबोरी ता. राहुरी जिल्हा अहिल्यानगर.

पान १ वरुन

माणुसकीच्या गावपणाला सलाम..!

पाचशे रुपयांचा किराणा देण्याचेही घोषित करण्यात आले. विविध संस्था, पतसंस्था, शिक्षक, माजी विद्यार्थी, वर्गमित्र आणि परदेशात असलेल्या ग्रामस्थांनीही मदतीचा हात दिला.

जमा झालेली दोन लाख रुपयांची रक्कम बँकेत ठेव म्हणून ठेवण्यात येणार आहे. एका कष्टकरी पित्याच्या पश्चात त्याच्या लेकींच्या स्वप्नांना आधार देणाऱ्या बेलापूरकरांनी गावपण आणि माणुसकी आजही जिवंत असल्याचे सिद्ध केले आहे.

अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश...

असल्याचे ते म्हणाले.महाविद्यालयाच्या मंजुरीच्या प्रक्रियेत कोणी प्रयत्न केले किंवा कोणी विरोध केला, यावर आता चर्चा करण्यापेक्षा संस्थेच्या प्रगतीला प्राधान्य दिले पाहिजे. ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे, तसेच विरोध करणाऱ्यांचेही आभार मानून आता पुढे जाण्याची गरज आहे. महाविद्यालय सुरू झाले असून विद्यार्थ्यांचे प्रवेशही झाले आहेत. त्यामुळे जुन्या वादांमध्ये न अडकता संस्थेच्या विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे मत खा. लंके यांनी व्यक्त केले.

खासगी संस्थांचा विस्तार करण्याबरोबरच शासकीय संस्थाही सक्षम आणि दर्जेदार झाल्या पाहिजेत. सर्वसामान्य नागरिकांना चांगले उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय आरोग्यव्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. अहिल्यानगरचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यसेवेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल असल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची चेष्टा होणार नाही, 'एनडीआरएफ'कडूनही मदत मिळेल : बावनकुळे

येत्या काळात सरकार शेतकऱ्यांना मदत करणारच आहे. पण, सध्याची परिस्थिती लक्षात घेता अग्रिम म्हणून दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची मदत देण्यात येईल, अशी घोषणा नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पण ही ५ हजारांची मदत म्हणजे शेतकऱ्यांची चेष्टा असल्याची टीका विरोधक तसेच शेतकरी नेत्यांनी केली. तीव्र दुष्काळामुळे शेतकरी कोलमडला असून ही मदत तुटपुंजी असल्याचा दावा त्यांनी केला. पीक पूर्णतः नष्ट झाले असून त्यासाठी केलेला खर्चही वाया गेला आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने हेटरी १ लाख रुपयांची मदत द्यावी. त्यांचे संपूर्ण कर्जमाफ करावे. सिंचनासाठी अखंडित वीज पुरवठा करावा. चारा छावण्या उभाराव्यात. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि शेतमजुरांना रोजगार मिळवून देण्याची व्यवस्था करावी, अशी मागण्या विरोधकांनी सरकारकडे केल्या आहेत.

तिरंगा यात्रेपूर्वी अभिजित दीपके पोलिसांच्या ताब्यात

आणि नोटीस बजावण्याची ही कोणती पद्धत, असा सवाल त्यांनी केला. या घटनेचा व्हिडिओ त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केला. दरम्यान, शांततापूर्ण निदर्शनांमुळे व्यवसायांचे नुकसान होत असल्याच्या दाव्यावर दीपके यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. हालचालींवरील निर्बंध आणि इंटरनेट सेवा बंद करण्यासारख्या उपायांचा सामान्य नागरिक व व्यावसायिकांनाच अधिक फटका बसतो, असा युक्तिवाद त्यांनी केला आहे.

कर्जदारांकडून पैसे वसूल केले, पण बँकेत भरलेच नाहीत

कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेत वसुली प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या सागर शिंदे आणि गोविंद बबन गाडे (रा. कांबी, ता. शेवगाव) यांनी मे ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत विविध कर्जदारांकडून कर्जाचे हप्ते रोख स्वरूपात वसूल केले. मात्र, ही रक्कम बँकेत जमा न करता परस्पर वापरल्याचा आरोप आहे. शाखा व्यवस्थापक संजय रघुनाथ भंडारे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधानाच्या कलम ४०९, ४२० आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर शिंदे फरार होता. त्याचा शोध सुरू असताना बेलवंडी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. पुढील तपासासाठी आरोपीला एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि बेलवंडी पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब क्षीरसागर, भाऊसाहेब यमगर, गाडीलकर आणि पोलीस कॉन्स्टेबल विनोद पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

शेतकरी संरक्षण कायदा काळाची गरज : अण्णा हजारे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : शेतकरी सध्या विविध संकटांचा सामना करीत असून, त्यांना संरक्षण देण्यासाठी शेतकरी संरक्षण कायदा ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक पद्मविभूषण अण्णा हजारे यांनी केले.



राळेगणसिद्धी येथे अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत शेतकरी संरक्षण कायदा मसुदा २०२६ संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे, प्रदेशाध्यक्ष अशोकराव सब्बन, ज्येष्ठ भ्रष्टाचारविरोधी नेते रामराव पाटील भदगले आणि नेवासा तालुका उपाध्यक्ष कल्याणराव मुरूमकर उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष सब्बन यांनी पूर्वमशागतीपासून पेरणी, पीक संगोपन आणि कापणीपर्यंत शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करून कायद्याचा मसुदा तयार केल्याचे सांगितले. डॉ. ढगे यांनी प्रगत देशांतील शेतकरी संरक्षणाच्या तरतुदींचा संदर्भ देत सर्पदंश, वन्यप्राण्यांचे हल्ले, ढगफुटी, ओला दुष्काळ आणि कोरडा दुष्काळ यांसारख्या संकटांपासून शेतकऱ्यांना संरक्षण मिळणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

कल्याणराव मुरूमकर आणि रामराव पाटील भदगले यांच्या हस्ते कायद्याच्या मसुद्याची प्रत अण्णा हजारे यांना देण्यात आली. हा मसुदा राज्य कायदा म्हणून मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली. मसुदा अभ्यासपूर्ण असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांना याबाबत तातडीने विनंती करण्याची ग्वाही अण्णा हजारे यांनी दिली.

यावेळी डॉ. अशोकराव ढगे लिखित 'कृषी तरंग' पुस्तकाची प्रत अण्णांना भेट देण्यात आली. चर्चेनंतर सोनू पवार यांनी आभार मानले. अण्णांचे सहायक अन्सार शेख यांनी पुढील कार्यवाहीसाठी लक्ष घालण्याची जबाबदारी स्वीकारली.

change of name

I HAVE CHANGE MY OLD NAME - SHUBHAM SURESH UDAVANT (AADHAR NO. 829246227189) (BEFORE NAME), MY NEW NAME - SHUBHAM SURESH UDAWANT (BOARD CERTIFICATE NO. 146303) PLACE - PUNTAMBA DATE:- 16/10/2026

ऊस संशोधनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल : डॉ. विलास खर्चे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च आणि ऊस लागवडीखालील क्षेत्रातील घट या आव्हानांवर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि दर्जेदार वाणांचे संशोधन आवश्यक आहे. ऊस संशोधनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र आणि भारतीय ऊस संशोधन संस्था, लखनऊ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय समन्वित ऊस संशोधन प्रकल्पाच्या ३६ व्या द्विवार्षिक कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. पाडेगाव येथील संशोधन केंद्राने आतापर्यंत १७ पेक्षा अधिक ऊस वाण विकसित केले असून, ११५



हून अधिक तंत्रज्ञानविषयक शिफारशी केल्या आहेत. भूमिगत निचरा प्रणालीमुळे दहा हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षारपड जमीन सुधारण्यास मदत झाली आहे. भविष्यातील संशोधनात पारंपरिक संकरित प्रजननासोबत जनुकीय तंत्रज्ञान आणि जलद प्रजनन पद्धतींचा वापर वाढविण्याची गरज डॉ. खर्चे यांनी व्यक्त केली. डॉ. डी. के. यादव यांनी विकसित वाण आणि कृषितंत्रज्ञान शेतकर्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे आवाहन केले.

वकृत्व स्पर्धेत कल्याणी बिरदवडे तालुक्यात प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. कल्याणी संजय बिरदवडे हिने पंचायत समिती, श्रीरामपूर येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे . त्याबद्दल तिचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, ज्येष्ठ सदस्य मंजाबापू थोरात , स्कूल कमिटी सदस्य व टाकळीभान सेवा संस्थेचे चेअरमन राहुल पटारे ,मुख्याध्यापक आर. एम. शिंदे, पर्यवेक्षक एस .एस जरे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे .



CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME RIHANA RIYAJALI PATEL (NAME AS PER OLD PASSPORT NO.J2783121) TO NEW NAME AS REHANA RIYAJALI PATEL VIDE AADHAR NO.5223 8191 0431

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE OLD NAME IN MYSADIQUA KHATOON KHAN (BEFORE NAME) TO NEW NAME AS SADIQUA TUFAIL AHMED KHAN (AADHAR NO. 6029 1403 1297) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC RAHATA PLACE- RAHATA DATE- 16/10/2026

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME KALYANI BAGUL (BEFORE NAME) TO NEW NAME AS KALYANI RAJESH BAGUL (AADHAAR NO.- 578960047635) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC NASHIK PLACE : NASHIK DATE : 16/10/2026

पान १ वरुन

शेतकऱ्यांची चेष्टा होणार नाही, 'एनडीआरएफ'कडूनही मदत मिळेल : बावनकुळे

पाठवायचे आहेत. ही अग्रिम मदत आहे. केंद्र सरकारच्या 'एनडीआरएफ'कडून जास्तीत जास्त मदत कशी मिळेल? राज्य आणि केंद्र सरकारचे तसेच पीक विमा योजनेचे जास्तीत जास्त पैसे शेतकऱ्यांना कसे मिळतील? त्यासाठी आमचे प्रयत्न सुरु असल्याचे महसूलमंत्र्यांनी सांगितले. तसेच आम्ही कर्जमाफी केली आहे. कर्जमाफीमध्ये अजून ५ ते ६ लाख शेतकऱ्यांचा समावेश असलेल्या याद्या अंतिम करायच्या आहेत. त्या केल्या जातील. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याची चेष्टा होणार नाही. शेतकऱ्यांना अडचणीत आणले जाणार नाही. ही जबाबदारी राज्य सरकारने घेतलेली आहे, असे मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. राज्यातील एकूण ३०४ तालुयांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

फुटवेअर दुकानातून गांजाची विक्री

१६७ ग्रॅम गांजा आणि कापडी पिशवी असा एकूण १ लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील अक्षय (पूर्ण नाव माहित नाही रा. चौंडी, जामखेड) या दुसऱ्या संशयिताचा शोध सुरू आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक १५ ऑटोबर रोजी श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांची माहिती घेत असताना ही माहिती मिळाली. त्यानंतर वरिष्ठांना कळवून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत पोलिसांनी पंचांसमक्ष दुकानाची झडती घेतली. यावेळी एका कापडी पिशवीत गांजा आढळून आला. चौकशीत हा गांजा अक्षय नावाच्या व्यक्तीकडून घेतल्याचे बोराडे याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९२३/२०२६ नुसार अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा १९८५ च्या कलम ८(क) व २०(ब)(ळळ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व श्रीगोंदा पोलिसांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जनावरांचे टॅगिंग करण्याची गरज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.याचा सर्वाधिक फटका शेतकरी आणि पशुपालकांना बसणार असून भविष्यातील संभाव्य पाणी व चारा टंचाई लक्षात घेता पशुधनाचे रक्षण करण्यासाठी शासनाने तत्काळ नियोजन करण्याची मागणी संजय पांडव यांनी केली आहे. तालुक्यातील ग्रामपंचायत सावंगी (लासूरस्टेशन) व कार्यक्षेत्रातील सर्व जनावरांचे टॅगिंग आणि ऑनलाइन नोंदणी पूर्ण करण्यासाठी गावनिहाय वेळापत्रक निश्चित करण्याचे आवाहन प्रशासनाला करण्यात आले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेतकरी असून पशुधन हे त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असून संभाव्य चारा व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कार्यक्षेत्रातील सर्व जनावरांची अचूक संख्या आणि सद्या स्थितीची शासनाकडे नोंद असणे आवश्यक आहे. सध्या काही जनावरांचे टॅगिंग व ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाली असली, तरी अनेक जनावरांची नोंदणी अद्याप प्रलंबित आहे.

ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर दिल्लीत तातडीने बैठक घेणार : बाबासाहेब पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगाच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी दिल्लीत तातडीने बैठक आयोजित करण्यात येईल, अशी ग्वाही सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.



मंत्रालयात सहकारमंत्र्यांच्या दालनात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत महत्त्वाची बैठक झाली. यावेळी माजी मंत्री सदाभाऊ खोत, सहकार विभागाचे सचिव प्रवीण दराडे, राज्य साखर आयुक्त संजय कोलते यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत उसाला प्रतिटन ५ हजार रुपये भाव मिळावा, साखरेची किमान विक्री किंमत प्रतिकिलो ५० ते ५५ रुपये करावी, इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७५ रुपये निश्चित करावा आणि साखर कारखान्यांचे वजनकाटे ऑनलाइन करावेत, या प्रमुख मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली.

या मागण्या केंद्र सरकारच्या अखत्यारीतील असल्याने मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून शेतकरी प्रतिनिधींना सोबत घेत दिल्लीत बैठक घेण्यात येईल, असे पाटील यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह, कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान आणि केंद्रीय अन्न व नागरी पुरवठामंत्री प्रल्हाद जोशी यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय उसाचा दर साखर उताऱ्यानुसार निश्चित करणे, प्रत्येक जिल्ह्यात वजनकाटे उभारणे, कारखान्यांच्या हिशेबात पारदर्शकता आणणे आणि शेतमालाचे दर ठरविताना उत्पादन खर्चाचा विचार करणे, अशा मागण्याही शिष्टमंडळाने मांडल्या. विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते.

निधनवार्ता

अंकुश लोंढे



नेवासा : तालुका कृषी सेवा केंद्र डीलर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष नेवासा येथील अंकुश विनायक लोंढे (वय ६८) यांचे वणी येथे देवी दर्शनाला गेले असता तेथेच आकस्मित निधन झाले. अंकुश लोंढे यांच्या पश्चात भाऊ, पत्नी,दोन मुली,दोन पुतण्या, जावई नातवंडे असा परिवार आहे. नेवासा येथील सर्वात जुन्या राजकमल कृषी सेवा केंद्र या फर्मचे ते मालक होते. नेवासा तालुका कृषी सेवा केंद्र डीलर्स असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष ही होते.

ज्ञानदेव गडाख



सोनई : नेवासा तालुक्यातील सोनई जवळील कण्हेर वस्ती येथील निवासी ज्ञानदेव उर्फ रायभान निंबा गडाख (वय ६५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. डेंटल कॉलेजचे अंबादास गडाख,वांबोरी कारखान्यातील देवीदास गडाख व गुलाब गडाख यांचे ते वडील होत.

विविध मागण्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून कामकाज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : 'समान काम-समान वेतन' यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयांतील न्यायालयीन कर्मचारी आंदोलनाच्या तयारीत आहेत. मागण्या मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबर२०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कर्मचारी गट-क संघटनेचे अध्यक्ष विजयराव दांडगे यांनी प्रसिद्धीपत्रकाडरे दिला होता परंतु अद्याप पर्यंत शासनाने मागण्या मान्य केल्या नसल्याने १६ ऑक्टोबर रोजी गंगापूर येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून कामकाज



केले. मुंबई उच्च न्यायालय व खंडपीठातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी,अशी मागणी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने केली असून महासंघाचे अध्यक्ष दिगंबर निकम यांनी मुख्य न्यायमूर्ती व महाप्रबंधकांकडे निवेदन दिले होते. हे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले असून, मात्र दीड वर्षापासून प्रलंबित असल्याचे संघटनेने म्हटले आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची सुरुवात १६ सप्टेंबरला एक दिवस काळी फीत लावून कामकाज करुन सुरू करण्यात आली मागण्या मान्य न झाल्याने १६ व १७ ऑक्टोबरला काळी फीती लावून कामकाज करणार असून मागण्या मान्य न झाल्यास, ५ नोव्हेंबरला सामूहिक रजा घेऊन लाक्षणिक संप आणि त्यानंतर १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्यात येणार असल्याचे यावेळी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बोलताना सांगितले.यावेळी न्यायालयीन अधीक्षक सुरेश पाटील अधीक्षक राजश्री मोदी ,सहाय्यक अधीक्षक विठ्ठल इंगे, सहाय्यक अधीक्षक राजेंद्र गाढवे, तसेच लघुलेखक व लिपिक, कनिष्ठ लिपिक ,बेलीफ शिपाई आदींनी काळ्या फिती लावून कामकाज केले.

सुकेवाडीचे मंगेश शिंदे संघर्षातून बनले महसूल सहाय्यक अधिकारी आ. खताळ यांनी केला मंगेशचा सन्मान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : गोरक्ष नेहे मनाशी जिद्द बाळगून ध्येयाच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले, तर अपयशालाही यशात रूपांतरित करता येते, हे सुकेवाडी येथील मंगेश बबन शिंदे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत सलग दोन प्रयत्नांत अपयश आले, तरी खचून न जाता त्यांनी अभ्यास सुरूच ठेवला. अखेर तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी यशाला गवसणी घालत महसूल सहाय्यक पदासाठी निवड मिळविली. १,५०० जागांसाठी झालेल्या भरती प्रक्रियेत मंगेश यांनी ४०० वा क्रमांक मिळविला असून, त्यांची छत्रपती संभाजीनगर विभागात महसूल सहाय्यक म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे सुकेवाडी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मंगेश शिंदे यांनी बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण संगमनेर महाविद्यालयात पूर्ण केले. शिक्षण घेत असतानाच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत अधिकारी म्हणून काम करण्याचे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले होते. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्यांनी एमपीएससीच्या अभ्यासाला सुरुवात केली. स्पर्धा परीक्षेतील आव्हाने, अभ्यासाचा मोठा आवाका आणि यश मिळविण्यासाठी आवश्यक असलेली सातत्यपूर्ण मेहनत यांची जाणीव ठेवून त्यांनी अभ्यासाचे नियोजन केले.

दररोज दहा ते बारा तास अभ्यास, हेच यशाचे गमक!

एमपीएससी परीक्षेची तयारी करताना मंगेश यांनी दररोज दहा ते बारा तास अभ्यास करण्यावर भर दिला. ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने मेहनत घेण्याचा त्यांनी निर्धार केला होता. मात्र, पहिल्या प्रयत्नात त्यांना यश मिळाले नाही. दुसऱ्या प्रयत्नातही अपयशाचा सामना करावा लागला. दोन वेळा अपयश पदरी पडल्याने त्यांच्या समोर मोठे आव्हान उभे राहिले; मात्र त्यांनी हार मानली नाही. अपयशातून धडा घेत त्यांनी पुन्हा त्याच जोमाने अभ्यासाला सुरुवात केली आणि . तिसऱ्या प्रयत्नात तरी यश मिळेल की नाही, याची चिंता मनात असताना ही त्यांनी आपले प्रयत्न थांबविले नाहीत. अखेर त्यांच्या मेहनतीला यश आले आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या निकालात त्यांचे नाव झळकले.

आई-वडिलांच्या कष्टांचे झाले चीज

मंगेश यांचे वडील बबनराव शिंदे हे सुकेवाडी ग्रामपंचायतीत लिपिक पदावर प्रामाणिकपणे सेवा बजावत आहेत. तर आई सरुबाई शिंदे या मोलमजुरी करून कुटुंबाचा उदर निर्वाह भागविण्यासाठी हातभार लावला . मर्यादित परिस्थितीतही मुलाने शिक्षण घेऊन मोठे व्हावे आणि शासकीय सेवेत अधिकारी बनावे, असे स्वप्न त्यांच्या आई-वडिलांनी, भावाने व नातेवाइकांनी पाहिले होते. मुलाच्या शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी कुटुंबीयांनी घेतलेल्या कष्टांना अखेर यशाचे फळ मिळाले आहे. मंगेश यांची महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याची बातमी समजताच आई-वडील, भाऊ आणि नातेवाइकांचा आनंद गगनात मावेनासा झाला. आपल्या मुलाने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळविलेल्या यशामुळे कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

तरुणांसमोर प्रेरणादायी आदर्श

आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक विद्यार्थी शासकीय नोकरीचे स्वप्न पाहतात; मात्र अपयश आल्यावर काही जण निराश होतात. अशा विद्यार्थ्यांसाठी मंगेश शिंदे यांचा प्रवास प्रेरणादायी ठरणारा आहे. दोन प्रयत्नांत अपयश आले तरी ध्येयापासून विचलित न होता त्यांनी तिसऱ्या प्रयत्नात यश मिळविले. नियमित अभ्यास, संयम, आत्मविश्वास आणि कुटुंबीयांची साथ यांच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

	२३६		२४०		२७०
१	३८०	६	३३०	९	२८९
	३३५		६००		११७

५१-१८-२६-६०-३९-९७

कल्याण
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

	१६९		१५६		१४५
६	२४०	२	१२९	०	२३५
	३३०		११०		५५०

३६-६४-५२-२१-७०-०८

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

	१४९		१२०		१२४
४	२४८	३	६७०	७	४६७
	६८०		५८०		७००

१४-४०-२३-३९-५७-७८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
01/06/2026 to 05/06/2026	4 4 0 — 89 — 1 3 5	9 9 0 — 80 — 1 2 7	2 6 0 — 82 — 5 7 0	1 2 8 — 11 — 2 9 0	5 9 0 — 48 — 1 3 4
08/06/2026 to 12/06/2026	4 5 6 — 56 — 1 2 3	5 5 6 — 67 — 1 8 8	4 5 8 — 76 — 4 6 6	2 4 0 — 69 — 3 7 9	6 8 9 — 33 — 1 3 9
15/06/2026 to 19/06/2026	1 1 9 — 15 — 2 4 9	3 4 8 — 50 — 1 3 6	1 5 8 — 42 — 3 9 0	2 5 7 — 41 — 2 4 5	1 2 6 — 90 — 6 7 7
22/06/2026 to 26/06/2026	3 3 6 — 21 — 2 4 5	1 1 8 — 04 — 1 5 8	6 8 9 — 33 — 7 7 9	1 6 8 — 55 — 2 4 9	5 7 9 — 19 — 2 8 9
29/06/2026 to 03/07/2026	1 4 4 — 95 — 2 4 9	1 2 7 — 04 — 7 8 9	2 5 7 — 47 — 2 6 9	1 5 7 — 34 — 2 6 6	2 5 5 — 22 — 6 7 9
06/07/2026 to 10/07/2026	5 5 8 — 84 — 3 5 6	1 2 0 — 36 — 7 9 0	2 3 7 — 21 — 4 7 0	1 5 0 — 60 — 1 3 6	2 7 7 — 69 — 1 4 4
13/07/2026 to 17/07/2026	1 3 0 — 41 — 1 5 5	6 8 0 — 47 — 3 6 8	1 2 8 — 18 — 3 5 0	3 7 9 — 90 — 1 3 6	1 5 0 — 63 — 3 0 0
20/07/2026 to 24/07/2026	3 6 0 — 96 — 1 1 4	2 7 7 — 64 — 7 7 0	2 5 9 — 60 — 1 4 5	1 8 9 — 81 — 5 7 9	1 7 9 — 78 — 1 7 0
27/07/2026 to 31/07/2026	2 5 9 — 60 — 5 5 0	5 9 0 — 42 — 2 2 8	3 5 8 — 62 — 3 9 0	4 0 0 — 47 — 8 9 0	1 6 0 — 70 — 4 8 8
03/08/2026 to 07/08/2026	2 3 4 — 90 — 5 6 9	1 7 0 — 85 — 1 5 9	3 3 8 — 42 — 1 2 9	4 6 0 — 09 — 4 7 8	3 7 0 — 05 — 3 4 8
10/08/2026 to 14/08/2026	5 7 7 — 99 — 2 3 4	2 3 0 — 53 — 1 4 8	2 5 0 — 70 — 2 3 5	3 5 5 — 39 — 1 3 5	1 3 3 — 76 — 3 5 8
17/08/2026 to 21/08/2026	2 4 0 — 60 — 4 6 0	2 7 8 — 73 — 3 4 6	1 1 6 — 82 — 4 8 0	1 5 6 — 23 — 7 7 9	4 4 9 — 77 — 1 7 9

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१२९	२८०
२९	०९
१३५	४७८

श्रीगोंद्यात प्रथमच भव्य दांडिया स्पर्धा

महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद! हिरकणी ग्रुप, बेलवंडीने पटकावला प्रथम क्रमांक

। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : श्रीगोंदा शहराच्या इतिहासात प्रथमच सखी सन्मती फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य दिव्य दांडिया स्पर्धा महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात उत्साहात पार पडली. रंगीबेरंगी वेशभूषा, तालबद्ध दांडिया आणि महिलांच्या कलागुणांच्या आकर्षक सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. सिनेअभिनेत्री रेवती लेले यांच्या विशेष उपस्थितीने कार्यक्रमाचे आकर्षण आणखी वाढले.

या कार्यक्रमाला आमदार हेमंत ओगले, श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सानप, माजी नगराध्यक्षा शुभांगी पोटे, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत ओगले, नगरसेविका दिपाली बोरुडे आणि उपसरपंच किरण लकडे यांची उपस्थिती होती.

ग्रुप दांडिया स्पर्धेत बेलवंडीच्या हिरकणी ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावत १० हजार १ रुपयांचे पारितोषिक मिळवले. सिद्धिविनायक ग्रुपने द्वितीय क्रमांकासह ७ हजार १ रुपये, तर नवरंगी नारी ग्रुपने तृतीय क्रमांकासह ५ हजार १ रुपयांचे पारितोषिक मिळवले.

वैयक्तिक स्पर्धेत उत्कृष्ट वेशभूषेसाठी प्रियांका वाघमारे, तर उत्कृष्ट वैयक्तिक सादरीकरणासाठी निकिता शर्मा यांची निवड करण्यात आली. दोघींनाही प्रत्येकी १ हजार १ रुपये, पदक आणि चषक देऊन गौरविण्यात आले. याशिवाय आदिका उदमले यांना टेबल फॅन, स्नेहा वाबळे यांना मिक्सर आणि मीना क्षीरसागर यांना हॉटकेस संच देऊन विशेष बक्षिसांनी सन्मानित करण्यात आले. महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सखी सन्मती फाउंडेशनच्या संस्थापिका हेमांगी प्रशांत ओगले, रूपा लौकिक मेहता आणि प्रणाली सुमेध गजभिये यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. विविध महिला गटांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. सहभागी स्पर्धक, मान्यवर आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांनी आभार मानले.

दखल



रेणुका माता देवस्थानच्या रक्तदान शिबिराला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

अहिल्यानगर : नवरात्रोत्सवाच्या भक्तिभावाला सामाजिक बांधिलकीची जोड देत एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. देवीच्या दर्शनासाठी मंदिरात आलेल्या भाविकांनी रक्तदान करून मानवसेवेचा आदर्श घालून दिला. यावेळी रक्तदानाबरोबरच भाविकांची रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली. श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न ट्रस्टने केला आहे. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून रक्तदान शिबिर आणि दररोज विविध आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते. अपघात, गंभीर आजार, शस्त्रक्रिया तसेच विविध वैद्यकीय उपचारांदरम्यान अनेक रुग्णांना रक्ताची आवश्यकता असते. अशा वेळी रक्तदात्यांनी केलेले रक्तदान गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरू शकते. ही सामाजिक गरज लक्षात घेऊन ट्रस्टच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

श्री दुर्गा सप्तशती पाठाच्या मंत्रोच्चाराने परिसर भक्तिमय



अहिल्यानगर : शारदीय नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा आणि शक्तीच्या आराधनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. नवरात्रातील प्रत्येक दिवसाला धार्मिक महत्त्व असून, या काळात देवीची आराधना, नामस्मरण आणि विविध धार्मिक विधी मोठ्या श्रद्धेने केले जातात. याच पार्श्वभूमीवर पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी मंदिरात वृंदावन कॉलनी महिला केंद्राच्या वतीने श्री दुर्गा सप्तशती पाठाचे आयोजन करण्यात आले. मंत्रोच्चार, देवीच्या नामाचा गजर आणि धार्मिक विधींमुळे मंदिर परिसरात भक्तिमय व मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. या धार्मिक सोहळ्यात महिला भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत श्रद्धेने देवीचे नामस्मरण केले आणि देवीचा आशीर्वाद घेतला. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात या धार्मिक कार्यक्रमामुळे आणखी भर पडली. पूजा-विधी आणि श्री दुर्गा सप्तशती पाठाच्या पठणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. दुर्गा सप्तशती पाठाचे धार्मिक महत्त्व श्री दुर्गा सप्तशती या ग्रंथात एकूण १३ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. या ग्रंथाला 'देवी महात्म्य' आणि 'चंडीपाठ' असेही म्हटले जाते. यामध्ये महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या देवीच्या स्वरूपांचे वर्णन करण्यात आले आहे. धार्मिक श्रद्धेनुसार, दुर्गा सप्तशती पाठ केल्याने मानसिक शांती आणि आत्मविश्वास मिळण्यास मदत होते, तसेच संकटांचा सामना करण्याचे बळ प्राप्त होते, अशी भाविकांची धारणा आहे.

श्रीराम कुस्ती संकुलाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



अहिल्यानगर : येथील श्रीराम कुस्ती संकुलातील खेळाडूंनी विद्यापीठीय आणि शालेय कुस्ती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड मिळवली आहे. या यशामुळे संकुलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, कै. आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे कुस्ती क्षेत्रातील स्वप्न साकार होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. या यशस्वी खेळाडूंचा आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात पैलवान मोहित म्हस्के याची २१ वर्षांखालील ९७ किलो वजन गटातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यमाई मातेच्या दरबारात नवदुर्गाचा भक्तीमेळा; ललित पंचमी उत्साहात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : महाराष्ट्राची कुलस्वामिनी आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राशीन येथील श्री जगदंबा (यमाई) देवी मंदिरात ललित पंचमीनिमित्त गुरुवारी (ता. १५) हजारो महिला भाविकांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली. पहाटे तीन वाजल्यापासूनच राशीनसह परिसरातील महिलांनी देवीच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. हळदी-कुंकू, साखर आणि नागवेलीची पाने एकमेकींना देत महिलांनी ललित पंचमीचा उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा केला. नवरात्रोत्सवातील ललित पंचमीच्या निमित्ताने मंदिर परिसर पहाटेपासूनच महिलांच्या गर्दीने फुलून गेला होता. नटूनथटून आलेल्या महिलांनी कुलस्वामिनी यमाई देवीच्या चरणी नतमस्तक होत सुख, समाधान, समृद्धी आणि सौभाग्याच्या रक्षणासाठी प्रार्थना केली. एकमेकींना हळदी-कुंकवाचा मान देत, साखर आणि पानसुपारीची भेट देत महिलांनी या पारंपरिक उत्सवाचा आनंद लुटला.

ललित पंचमीच्या औचित्याने देवीच्या सिंहासनासह गाभाऱ्यात रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. पुजारी सुनील रेणुकर, शुभम रेणुकर, दर्शन रेणुकर, ज्ञानेश्वर रेणुकर आणि ओंकार रेणुकर यांनी जगदंबा देवीची गजारूढ रूपातील महावस्त्रालंकार पूजा बांधली होती. पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील न्हावरा फाटा येथील विजय विश्वनाथ घावटे यांनी देवीच्या सिंहासनासह संपूर्ण मंदिराची आकर्षक पुष्पसजावट केली होती.

ललित पंचमीची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात आहे. बदलत्या काळातही महिलांनी धार्मिक परंपरा आणि परस्परांतील स्नेह जपत जगदंबा देवीच्या भक्तीचा जागर केला. हजारो महिलांच्या उपस्थितीमुळे राशीनच्या यमाई देवी मंदिरात दिवसभर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

देवीभोयरेची स्वयंभू अष्टभुजा अंबिका देवी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पारनेर : तालुक्यातील देवीभोयरे येथील श्री अंबिका देवीचे स्वयंभू स्थान हे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. जागृत देवस्थान म्हणून ख्याती असलेल्या या मंदिरात नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होत असते. नवसाला पावणारी देवी, अशी अंबिका देवीची परिसरात श्रद्धा असून, देवीच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह विविध भागांतून भाविक येतात.



देवीभोयरे गावाच्या नावामागेही या देवस्थानाची एक रंजक कथा सांगितली जाते. गावातील प्रख्यात ब्राह्मण घराण्यातील श्री रेणुकामाता यांच्याशी या स्थानाचा संबंध जोडला जातो. पूर्वी माहूरगड येथे रेणुकामातेच्या दर्शनासाठी नियमित वारी करणाऱ्या भाविकांना वृद्धापकाळामुळे प्रवास करणे कठीण झाले. त्यामुळे त्यांच्या दर्शनवारीत खंड पडला. यामुळे व्यथित झालेल्या भाविकांना रेणुकामातेच्या दर्शनाची ओढ लागून राहिली.

अशा वेळी श्री रेणुकामातेने त्यांना स्वप्नदृष्टांत दिल्याची आख्यायिका सांगितली जाते. स्वप्नात देवीने मीच तुझ्या गावात प्रकट होईन, असा संकेत दिला. त्यानंतर गावातील भुयारातून अंबिका देवीची तांदळाकार पाषाणमूर्ती स्वयंभू स्वरूपात प्रकट झाल्याची श्रद्धा आहे. या पवित्र स्थानामुळे गावाला 'देवीभोयरे' हे नाव पडल्याचे सांगितले जाते. देवीची मूर्ती पूर्णपणे पितळी असून, देवीच्या आठही हातांमध्ये विविध आयुधे आहेत. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना येथे विशेष आध्यात्मिक समाधान लाभते. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीला नऊवारी साडी, सोन्याच्या दागिन्यांचा साज चढविण्यात येतो. दररोज सकाळी व सायंकाळी दोन वेळा आरती केली जाते. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते. नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी सपत्नीक पाठ व देवीक्षेत्रातील धार्मिक विधींसह घटस्थापना केली जाते. नऊ दिवस चालणाऱ्या उत्सवात झेंडू, मखमल आणि शेजारील गोवारी व कांजणाई यांच्या मुखवट्यांसह विविध धार्मिक परंपरा जपल्या जातात. देवीसमोर हजारो नंदादीप लावले जातात. आरती, छबिना आदी धार्मिक कार्यक्रमही नियमितपणे पार पडतात.

धरणांत पाणी, मग शेतकऱ्यांच्या आवर्तनाला विलंब का?

घोड-कुकडीचे पहिले आवर्तन १ नोव्हेंबरपूर्वी सोडा; शेतकऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : धरणांत पाणीसाठा उपलब्ध असताना शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची प्रतीक्षा का करावी लागते, असा सवाल उपस्थित करत घोड-कुकडीचे पहिले आवर्तन १ नोव्हेंबरपूर्वी सोडण्याची मागणी श्रीगोंद्यातील शेतकरी नेत्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. घोड धरणात ९२ टक्के, तर कुकडी लाभक्षेत्रात ९६ टक्के पाणीसाठा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पिकांना वेळेत पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने सिंचनाचे नियोजन जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांची शेती घोड व कुकडीच्या पाण्यावर अवलंबून आहे. पिकांना पाण्याची गरज असताना आवर्तनाबाबत स्पष्टता नसल्यास शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडते. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची गरज आणि आगामी सिंचनाची आवश्यकता यांचा समतोल साधून पाणीवाटपाचे नियोजन करणे आवश्यक आहे. पिकांचे नुकसान झाल्यानंतर मदतीची चर्चा करण्यापेक्षा नुकसान टाळण्यासाठी वेळेत पाणी देणे महत्त्वाचे आहे, अशी भूमिका शेतकरी प्रतिनिधींनी मांडली आहे.

घोड व कुकडी धरणांतील प्रत्यक्ष उपलब्ध पाण्याचा आढावा घेऊन पात्र लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे. संबंधित पाटबंधारे अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन पहिले आवर्तन १ नोव्हेंबरपूर्वी सोडण्याचा निर्णय घ्यावा आणि पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी राजेंद्र म्हस्के, अनिल घनवट, ॲड. राजेंद्र नागवडे, स्मितल वाबळे, गोरखराजे उंडे, परेश वाबळे, अनिल उंडे, वैभव तावरे, गणेश पोकळे, सागर शेळके, 'आप'चे शहर उपाध्यक्ष प्रशांत दरेकर, दिलीप घुले, ड. विद्याताई शिंदे यांच्यासह इतर पदाधिकारी व शेतकरी प्रतिनिधी या मागणीसाठी उपस्थित होते.

दुष्काळाचे सावट दूर होण्यासाठी श्री तुळजाभवानी चरणी प्रार्थना : वारे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात दुष्काळाचे सावट लवकरात लवकर दूर व्हावे आणि नागरिकांवरील पाणीटंचाईचे संकट टळावे, यासाठी भाविकांनी श्री तुळजाभवानी मातेच्या चरणी प्रार्थना केली. यावेळी मातेच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला. नगरसेविका गौरी अजिंक्य बोरकर, नगरसेवक निखिल वारे आणि उद्योजक मच्छिंद्र इंगळे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानच्या वतीने सिद्धार्थ लक्ष्मण तागड यांनी सलग दुसऱ्यांदा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाचे कौतुक करून इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, दुष्काळाचे सावट गंभीर असून आगामी काळात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीचा संकल्प करणे आवश्यक आहे.

टँकरचे पाणी पिऊन प्रभारी जिल्हाधिकारी हिंगे यांनी जपली माणुसकी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी : टंचाईची तीव्रता वाढत आहे. शासकीय यंत्रणेने व त्यांच्याशी संबंधित सर्वच यंत्रणांनी समन्वयाने कामे करत टंचाईग्रस्तांबरोबर सुसंवाद ठेवा. त्यांना मानसिक आधार द्या. टँकरच्या खेपा वेळेवर गेल्या पाहिजेत, यासाठी आग्रही रहा. पिण्यायोग्य शुद्ध पाणीच टँकरद्वारे द्या. लोकांच्या आरोग्याची सुद्धा काळजी घ्या... अशा शब्दात प्रशासकीय यंत्रणेला सूचना देत प्रभारी जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी टँकर मधील पाणी स्वतः पिऊन पहात उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना तेच पाणी प्यायला लावून पाण्याच्या दर्जाबाबत खात्री केली.

जिल्हाधिकाऱ्यांनी अचानकपणे अशा पद्धतीने कृती केल्याने त्यांच्यातील सामाजिक जबाबदारीचे भान, माणुसकीची भावना व सर्वसामान्य माणसाविषयी असलेली बांधिलकीची जाणीव बघून उपस्थित सर्वजण निःशब्द झाले. ग्रामस्थांनी सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांच्या अशोक कृतीला दाद देत मनापासून कौतुक केले.

वरिष्ठ अधिकारी शेतकरी कुटुंबातील बहुसंख्येने असतात. पदावर बसल्यानंतर मात्र बाटलीबंद पाण्याशिवाय त्यांना इतर पाणी चालत नाही. त्यातही ऍगमार्क असलेल्या ब्रॅण्डेड कंपन्याचे पाणी लागते, अशी स्थिती एका बाजूला असताना दुसऱ्या बाजूला जनतेच्या सुखदुःखाची काळजी करत भरलेल्या टँकर मधील पाणी स्वतः पिऊन पहात लोकांच्या कल्याणाची काळजी करणारा अधिकारी असे चित्र खरोखरच सर्वसामान्यांच्या दृष्टीने दिलासादायक ठरले.

शासनाचे आदेश व योजना लोकांपर्यंत पोहोचवणारी यंत्रणा म्हणून प्रशासनाकडे बघितले जाते. शासनाचा आरसा म्हणून समजल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेच्या सुखदुःखाची एवढ्या जागरूकपणे काळजी घेतली तर खऱ्या अर्थाने रामराज्य यायला वेळ लागणार नाही. मागील पंधरवड्यामध्ये आढावा बैठकीदरम्यान पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी शासन टंचाईग्रस्त गावांना आर ओ चे पाणी उपलब्ध करून देणार असून अहिल्या नगर जिल्ह्यामध्ये असा उपक्रम राज्यात प्रथमच अमलात येणार असल्याची घोषणा केली. त्याची कामे सध्या सुरू आहेत. शेवगाव तालुक्यातील राक्षी येथे टँकर भरण्यासाठी चा उद्भव आहे. तेथूनच बहुतांशी टँकर पाथर्डी व शेवगावच्या तालुक्यातील टंचाईग्रस्त भागात जातात. टँकरची अवस्था, पाणी गळती, याकडे गांभीर्याने लक्ष पुरवून खेपांची संख्या व वेळापत्रक तपासण्यासाठी गटविकास अधिकारी व पाणीपुरवठा विभागाच्या उप अभियंत्यांनी संयुक्तपणे पाहणी करावी. टँकर व खेपा याबाबत कोणताच हलगर्जीपणा होणार नाही याची काटेकोर दक्षता घ्यावी. पिकांचे पंचनामे वेळेवर पूर्ण करा.

टंचाईची तीव्रता वाढत चालल्याने सर्वसामान्य माणसांच्या भावना संवेदनक्षम झाल्या आहेत. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, याची स्वतः जाणीव ठेवून सर्वत्र यंत्रणांनी याबाबतच्या गंभीर परिस्थिती बद्दल लोक जागृतीचे काम सुद्धा अधिकाऱ्यांनी करावे. अशा स्वरूपाच्या सूचना करत जिल्हाधिकाऱ्यांनी तालुक्यातील शेकटे गावाला भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला.

सायंकाळी मोहटादेवी येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त सपत्नीक महाआरती करून दुष्काळासारखी सर्व संकटे दूर करून भरपूर प्रमाणात देवीने पाऊस पाडावा, सर्व रयतेवरील संकटे दूर करण्याची प्रार्थना केली यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ उद्धव नाईक, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे गटविकास अधिकारी राजेंद्र राख आदींसह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांच्या अशा तपासणी मोहिमेमुळे आज विविध टँकर भरण्याच्या ठिकाणी चालक व देखरेख करणाऱ्या व्यवस्थेने टँकरच्या स्वच्छतेबाबत खात्री केली. काहींनी टँकर पुन्हा एकदा धुवून घेत त्यानंतर पाणीपुरवठा सुरू केला.

आजच्या वाचनातून घडेल उद्याचे आदर्श जीवन : चिंतामणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



जामखेड : विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात आणि स्वच्छतेच्या सवयींचे महत्त्व पटावे, या उद्देशाने दि पिपल्स एज्युकेशन सोसायटी संचलित ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जामखेड येथे वाचन प्रेरणा दिन आणि जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते 'कुसुमाग्रज वाचन कोपऱ्याचे' उद्घाटन करण्यात आले. वाचन संस्कृती रुजविण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला केंद्रप्रमुख राम निकम, नगराध्यक्ष अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष नाना राळेभात, गटनेते तात्याराम पोकळे, मनोज कुलकर्णी, नगरसेवक अनिल शेळके, श्रीराम डोके, प्रा. विकी घायतडक, मोहन पवार, सागर टकले, प्रवीण होळकर, हर्षल काळे, विद्यालयाचे प्राचार्य बी. ए. पारखे, पर्यवेक्षक सुदाम वराट, ग्रंथपाल संतोष देशमुख यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

केंद्रप्रमुख राम निकम यांनी आपल्या मनोगतात डिजिटल युगातील वाचनाचे महत्त्व विशद केले. मोबाईल आणि डिजिटल माध्यमांचा वाढता वापर होत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या वतीने आठवड्यातून दोन दिवस 'वाचन डे' हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करून आपले ज्ञान वाढवावे आणि वाचनातून व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

नगराध्यक्ष अमित चिंतामणी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आज केलेल्या वाचनाचा उपयोग भविष्यात आदर्श जीवन जगण्यासाठी होतो, असे सांगितले. वाचनामुळे ज्ञान वाढते, विचारांना दिशा मिळते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दररोज वाचन करण्याची सवय लावून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यालयाचे प्राचार्य बी. ए. पारखे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी जीवनात मोठी स्वप्ने पाहावीत, ती पूर्ण करण्यासाठी ठाम संकल्प करावा आणि ध्येय गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

दखल

मासिक पाळीबाबत संकोच नको; शंकांचे मोकळेपणाने निरसन करा' : डॉ.मोनिका भेगडे



आळंदी : मासिक पाळी ही मुलींच्या जीवनातील नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे याबाबत संकोच किंवा भीती न बाळगता घरातील ज्येष्ठ महिला अथवा डॉक्टरांशी मोकळेपणाने संवाद साधावा आणि मनातील शंकांचे निरसन करून घ्यावे, असे आवाहन डॉ. मोनिका भेगडे यांनी केले. आळंदी येथील ज्ञानेश्वर विद्यालयात 'आरोग्य व मासिक पाळी' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीविषयी जागरूकता निर्माण करणे, गैरसमज दूर करणे आणि आरोग्याबाबत योग्य माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. मासिक पाळीदरम्यान वैयक्तिक स्वच्छता राखणे, संतुलित आहार घेणे आणि आरोग्याची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे आहे. या काळात कोणती खबरदारी घ्यावी, तसेच आरोग्यविषयक समस्या जाणवल्यास वैद्यकीय सल्ला कधी घ्यावा, याबाबत डॉ.भेगडे यांनी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. मासिक पाळीविषयी मनात कोणताही न्यूनगंड न ठेवता योग्य माहिती जाणून घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर विद्यार्थिनी आणि पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या वेळी प्राचार्य किसन राठोड, उपमुख्याध्यापक प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायिनी राजहंस, माता-पालक संघाच्या प्रतिनिधी, सहशिक्षिका आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दिवे येथे कातोबानाथ, जोगेश्वरी चरणी पिंजरी अर्पण



दिवे, ता. पुरंदर : दिवे पंचक्रोशीचे ग्रामदैवत कातोबानाथ आणि माता जोगेश्वरी यांच्या चरणी समस्त बारा बलुतेदार मंडळींच्या वतीने पारंपरिक पिंजरी अर्पण सोहळा उत्साहात पार पडला. तब्बल १४ वर्षांनंतर हा सोहळा झाल्याने ग्रामस्थ आणि भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. यापूर्वी २०१२ मध्ये हा उपक्रम झाला होता.या सोहळ्यानिमित्त पालखीवरील पिंजरी, आबदागिरी, छत्री, पालखीतील गादी तसेच नाथांच्या बैठकीची गादी अर्पण करण्यात आली. आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक चौकापासून मंदिरापर्यंत ढोल-ताशे, नगारे, सनई, संबळ आणि मानाच्या घोड्यासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या, तर महिलांनी गरबा नृत्य सादर करून सोहळ्याची शोभा वाढवली.

मंदिरात गणपत शितकल, गणीभाई मुलाणी, पुजारी दिगंबर गुरव, दीपक गुरव आणि सहकाऱ्यांच्या उपस्थितीत पारंपरिक वस्तूंचे पूजन करण्यात आले. महिलांनी वस्तूंचे औक्षण केले. त्यानंतर कातोबानाथ आणि माता जोगेश्वरी यांची आरती करण्यात आली. प्रसाद वाटपाने सोहळ्याची सांगता झाली.

या वेळी म्हस्कू पवार, तेजस सोनवणे, विठ्ठल कुंभार, गणपत जाधव, प्रणव गुरव, उत्कर्ष मोरे, अमोल शिंदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यायालयीन कर्मचारी काळ्या फिती लावून आंदोलनात



आळेफाटा : समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी जुन्नरसह राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज सुरू ठेवत शासनाचा निषेध नोंदविला.जुन्नर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी न्यायालयाच्या प्रवेशद्वारासमोर एकत्र येत प्रलंबित मागणीकडे शासनाचे लक्ष वेधले. सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव गेल्या २० ते २२ महिन्यांपासून शासनाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे.

शासनाने मागणी तातडीने मान्य न केल्यास १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. या आंदोलनाला जुन्नर वकील बार असोसिएशननेही पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे शासन या मागणीवर काय निर्णय घेणार, याकडे न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळग्रस्त भागातील पशुपालकांसाठी दिलासा

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत २०२६-२७ या वर्षासाठी विशेष सवलत

- **चारा बियाणे वाटपाच्या अटी शिथिल पशुधनाची किमान संख्या असण्याची अट शिथिल**
- **वैयक्तिक लाभार्थी व शेतकरी गटांना एकापेक्षा अधिक वेळा लाभाची संधी**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : राज्यात सन २०२६-२७ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांतील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या अटी शिथिल केल्या आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी तसेच शेतकरी गटांना अतिरिक्त चारा बियाणे व ठोंबे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही सवलत केवळ सन २०२६-२७ या वर्षासाठी लागू राहणार आहे.

योजनेच्या ९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःचे किमान तीन ते चार पशुधन असणे आवश्यक होते. मात्र, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन ही किमान पशुधनाची अट चालू वर्षासाठी शिथिल करण्यात आली आहे.

वैयक्तिक लाभार्थ्यांना चार हजार रुपयांचे चारा बियाणे :

योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्यास, एकापेक्षा अधिक वेळा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शेतकरी गटांना २० हजार रुपयांपर्यंत लाभ:

शेतकरी समूह किंवा गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर २० हजार रुपये किम तीचे चारा बियाणे देण्यात येते. चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असलेल्या गटांना, प्रथमच लाभ मागणाऱ्या अर्जदारांची मागणी पूर्ण झाल्यानंतर, उपलब्धतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा बियाणे वाटप करता येणार आहे.

सर्वसाधारणपणे ही योजना वर्षातून एकदाच राबविण्यात येते. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याची खातरजमा केल्यानंतर अतिरिक्त लाभ देण्याची सवलत देण्यात आली आहे. यासाठी संबंधित उपायुक्त पशुसंवर्धन यांनी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच, प्रथमच लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हा व विभागीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.योजनेबाबत अधिक माहितीसाठी पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सॲप चॅटबॉट क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

दुष्काळजन्य परिस्थितीत पशुपालकांना आर्थिक दिलासा देणे आणि चाऱ्याचा तुटवडा जाणवू न देणे यासाठी शासन कटिबद्ध आहे. अटी शिथिल केल्यामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त चारा उत्पादन घेता येईल. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्दे श सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

अत्याचाराच्या गुन्ह्यातील फरार आरोपी सोलापूर जिल्ह्यातून जेरबंद!

विनोद गोलांडे । राष्ट्र सह्याद्री

सोमेश्वरनगर : बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यात गुन्हा दाखल झाल्यापासून फरार असलेल्या आरोपीला वडगाव निंबाळकर पोलिसांनी सोलापूर जिल्ह्यातून अटक केली आहे. गणेश रामदास मदने (रा. को-हाळे खुर्द, ता. बारामती, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी धर्मपुरी (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथे सापळा रचून ही कारवाई केली.

वडगाव निंबाळकर पोलिसांची धडक कारवाई

लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची फिर्याद

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २१७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२)(I), ३५१(२), ३५१(३), ११५(२) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४, ५(थ्र) व ६ नुसार गुन्हा दाखल आहे.फिर्यादी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपीने तिला लग्नाचे खोटे आमिष दाखवून वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. तसेच तिचे फोटो व्हायरल करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी देऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता.

गोपनीय माहितीच्या आधारे सापळा

फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी वडगाव निंबाळकर पोलिसांकडून प्रयत्न सुरू होते. दरम्यान, आरोपी सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

या पथकाने केली कारवाई

सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अझर मुलाणी, सहायक फौजदार पन्हाळे, पोलीस हवालदार अनिल खेडकर, कल्याण खांडेकर, भागवत पाटील, सागर चौधरी, भाऊसाहेब मारकड, शशिकांत दळवी, अशोक शिंदे, संदीप गायकवाड तसेच पोलीस शिपाई आबा जाधव, नरेंद्र यादव, सूरज धोत्रे, सचिन घाडगे, सूरज पवार, नागनाथ परगे व विकास येटाळे यांनी ही कारवाई केली.या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अझर मुलाणी करीत आहेत.

न्यू इंग्लिश स्कूल, कवठे यमाई येथे माता-पालक संघाची स्थापना

भोंडला कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कवठे यमाई : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आणि शाळा व पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे माता-पालक संघाची स्थापना करण्यात आली आहे. या निमित्ताने शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता माता-पालक संघाची बैठक व पारंपरिक भोंडला कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

शाळेच्या विकासाम ध्ये माता-पित्यांचा सहभाग वाढावा, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा, तसेच पारंपरिक संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात माता-पालक संघाची बैठक आणि पारंपरिक भोंडला उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. न्यू इंग्लिश स्कुल मध्ये सकाळी साडे आठ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमासाठी सर्व माता-पिता, पालक आणि मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य शिवराम मुंजावडे, शिक्षकवृंद व माता-पालक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

अल-निनोच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात पाणीपुरवठ्याचे नियोजन

स्थानिक स्वराज्य संस्थांना २० टक्के कपातीच्या सूचना

- **३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : अल-निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन करून ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीला पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम, पुणे जिल्हा परिषद मुख्य अधिकारी श्री गजानन पाटील . जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता अम ोल कोल्हे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके , मुख्य अभियंता पुणे मनपा श्री जगताप, श्री तारू यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा वापर प्राधान्यक्रमाने करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. शासन निर्णय दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ अन्वये उपलब्ध जलसाठ्याचा विविध उपयोगांसाठी काळजीपूर्वक आणि काटकसरीने वापर करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाने पाण्याचे सूक्ष्म नियोजन केले आहे.

खडकवासला प्रकल्पात १५ ऑक्टोबर २०२६ रोजी मृतसाठा, बाष्पीभवन आणि बफर साठा वगळता अंदाजे २० टीएमसी पाणी उपलब्ध असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. हा साठा दरवर्षीच्या तुलनेत अंदाजे २५ टक्क्यांनी कमी असल्याने उपलब्ध पाणी पिण्यासाठी आणि सिंचनासाठी पुरविताना काटेकोर नियोजन करावे लागणार आहे. परतीचा पाऊस न झाल्याने पाण्याच्या वापरावर मर्यादा येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील पाणीपुरवठ्यात २५ टक्के कपात करण्याची आवश्यकता असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. तसेच शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची मागणी अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके यांनी मांडली.

स्थानिक स्वराज्य संस्थांना २० टक्के पाणी कपातीच्या सूचना

पवना, भामा आसखेड, चासकमान आणि नीरा प्रणालीतील प्रकल्पांमध्ये ९० ते ९५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असला, तरी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीपुरवठा टिकवून ठेवण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी २० टक्के पाणी कपात करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

उपलब्ध पाण्याचा विचार करून रब्बी हंगाम ासाठी सिंचन आवर्तन देण्यात येणार आहे. मात्र, सर्व प्रकल्पांमधील पाण्याचे नियोजन केल्यानंतर उन्हाळी हंगामातील सिंचनासाठी पुरेसा साठा शिल्लक राहण्याची शक्यता नसल्याने उन्हाळी सिंचन आवर्तन देणे शक्य होणार नसल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी संयुक्त पथके

अनधिकृत पाणी उपसा तातडीने रोखण्यासाठी महसूल, महावितरण, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त भरारी पथकांची स्थापना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनधिकृत पाणी उपशासाठी वापरण्यात येणारे पंप व मोटारी जप्त करण्याबरोबरच पाणीचोरी आढळल्यास म हावितरण विभागाने संबंधितांचे वीजजोडणी खंडित करण्यासाठी कठोर कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

फार्मर आयडीवर स्वतंत्र ओळखपत्रास मनाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत प्राप्त फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र शेतकरी ओळखपत्र तयार करणे आणि त्याचे वितरण करणे अनधिकृत असल्याचे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अशा प्रकारची ओळखपत्रे तयार करणे व वितरित करणे तात्काळ थांबवावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र ओळखपत्रे तयार करून वितरित केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) चालकांनी अशी कार्यवाही थांबवून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनीही अशा अनधिकृत सेवांचा लाभ घेऊ नये. तसेच, या माध्यमातून तयार केलेल्या ओळखपत्रांना अधिकृत मान्यता असल्याचे समजू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

पुणे महानगरातील एचसीएमटीआर व इनर रिंग रोडच्या भूसंपादनाला गती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संयुक्त मोजणी ३० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

पुणे : पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या २४ मीटर रुंदीच्या एचसीएमटीआर आणि ६५ मीटर रुंदीच्या इनर रिंग रोड प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या मार्गातील आवश्यक जमिनींची संयुक्त मोजणी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित संयुक्त आढावा बैठकीत या प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी, अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त पोलीस आयुक्त (वाहतूक) मनोज पाटील यांच्यासह जिल्हा प्रशासन, पुणे महानगरपालिका, पीएमआरडीए आणि पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही प्रकल्पांच्या मार्गातील जमिनींचे सीमांकन आणि संयुक्त मोजणी विहित मुदतीत पूर्ण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. राज्य शासनाच्या अखत्यारीतील आवश्यक जागांच्या हस्तांतरणासाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेली पूरक कागदपत्रे आणि तांत्रिक अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचनाही महानगरपालिकेला देण्यात आल्या.

पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एचसीएमटीआर आणि इनर रिंग रोड हे प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. या प्रकल्पांमुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास म दत होईल, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त (वाहतूक) मनोज पाटील यांनी सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले.

शालेय साहित्य वाटप करून खाजाभाई बागवान यांचा स्मृतीदिन साजरा

नितिन यादव । राष्ट्र सह्याद्री

सासवड : सासवड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष. शिक्षण मंडळाचे माजी सभापती दिवंगत खाजाभाई बागवान यांचा तृतीय स्मृतीदिन त्यांच्या परिवाराच्या वतीने नगरपालिकेच्या शाळेतील सर्व विदयार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला.येथील सावित्रीबाई फुले प्रशालेत झालेल्या या कार्यक्रमास माजी आमदार संजय जगताप प्रमुख अतिथी तर नगर पालिकेच्या पाणी पुरवठ्याचे सभापती ज्ञानेश्वर गिरमे व आरोग्य समिती सभापती राजन जगताप तसेच खाजाभाई यांचा मित्र परिवार यावेळी उपस्थित होता. वह्या, पेन्सिल, स्केचपेन, खोड रबर व खाऊचे यावेळी वाटप करण्यात आले खाजाभाई यांच्या काळातील नगरपालिका व शिक्षण मंडळाच्या अनेक आठवणीना संजय जगताप यांनी उजाळा देत त्यांच्या कामाचा गौरव केला.कुटुंबातील अनेक मुलांना बागवान यांनी उच्च पदस्थ अधिकारी केले तसेच समाजातील अनेक जणांना अधिकारी बनवण्यात व कित्येकांना नोकरी लावण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता असेही जगताप यांनी सांगितले. बागवान यांची नात आयत बागवान व नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे यांनीही म नोगतातून बागवान यांना आदरांजली वाहिली.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका संगीता म्हेत्रे, दिलीप ओतारी अशोक पवार, प्रा संदिप टिळेकर, हारून बागवान, बिपीन वेदपाठक, दादा भुजबळ, मोबीन बागवान, बाळासाहेब कुलकर्णी, माऊली जगताप, सुमय्या बागवान, शकील बागवान, प्रकाश जगताप, संजीव कांबळे, शिवाजीराव राजीवडे, नारायण चधरी, हाजी सरवानभाई बागवान यांसह शिक्षक व विद्यार्थी व बागवान यांचे कुटुंबीय या प्रसंगी उपस्थित होते. संतोष देवकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन तर अँड अशपाक बागवान यांनी आभार मानले



दखल

सावली स्कूलच्या विद्यार्थिनींचा शपथविधी उत्साहात

टाकळी ढोकेश्वर : सावली प्रतिष्ठान संचलित सावली स्कूल ऑफ नर्सिंग, टाकळी ढोकेश्वर येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींचा शपथविधी समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.नर्सिंग क्षेत्रात



प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींनी रुग्णसेवा,सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा आणि मानवतेच्या मूल्यांचे पालन करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. ऋत्विक खिलारी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.यशदा खिलारी,सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी आणि प्रा.नामदेव वाळुंज उपस्थित होते. डॉ. ऋत्विक खिलारी, प्रा वाळुंज,प्रा.शीतल गर्कळ,डॉ. यशदा खिलारी यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. नर्सिंग हा केवळ व्यवसाय नसून रुग्णांची सेवा करण्याचे पवित्र कार्य आहे. रुग्णांशी संवेदनशीलतेने वागणे, प्रामाणिकपणा, शिस्त, जबाबदारी आणि सेवाभाव या गुणांना नर्सिंग क्षेत्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मान्यवरांनी आपल्या भाषणांतून सांगितले. विद्यार्थिनींनी शिक्षणासोबतच व्यावहारिक ज्ञान आत्मसात करून कुशल आणि जबाबदार परिचारिका बनावे, असे आवाहनही करण्यात आले. प्रा.शीतल गर्कळ,प्रा. पुष्पा घुले आणि प्रा. पिंकी त्रिभुवन यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले

समर्थ क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा उत्साहात संपन्न



निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज बेल्हेच्या, समर्थ क्रीडा संकुल येथे पुणे ग्रामीण जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षाखालील मुला - मुलींच्या सहा गटांत एकूण ५१४ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, एकाग्रता आणि अचूकतेच्या जोरावर स्पर्धेत रंगत निर्माण केली. स्पर्धेचे उद्घाटन समर्थ शैक्षणिक संकुलाचे विश्वस्त वल्लभ शेळके, समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर, समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे तसेच क्रीडा शिक्षकांच्या उपस्थितीत झाले. शालेय स्तरावरील खेळाडूंना जिल्हास्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, क्रीडासंस्कृतीला प्रोत्साहन मिळावे आणि विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्ती विकसित व्हावी, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या सहाही गटांमध्ये खेळाडूंनी चुरशीच्या लढती दिल्या. कॅरमसारख्या खेळातून विद्यार्थ्यांची एकाग्रता, निर्णयक्षमता, संयम आणि अचूकतेचा विकास होतो. या स्पर्धेतील मोठ्या सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक असलेली आवड अधोरेखित झाली.

'जय माता दी'च्या जयघोषाने गुलमोहर रोड दुमदुमला



अहिल्यानगर : नवरात्रोत्सवानिमित्त सावेडी येथील गुलमोहर रोडवरील मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'माता की चौकी' हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. देवीच्या सुमधुर भक्तिगीतांनी मंत्रमुग्ध झालेल्या भाविकांनी 'जय माता दी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. देवीच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या भक्तिगीतांसह धार्मिक गीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात भक्तीचा रंग भरला. 'जय श्रीराम' या गीताच्या सादरीकरणावेळी अवतरलेल्या हनुमानजींच्या प्रतिकृतीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. जय वैष्णो माता जागरण मंडळाच्या वतीने बल्लू सचदेव यांनी देवीची विविध भक्तिगीते सादर केली. देवीच्या महिम्याचे वर्णन करणाऱ्या आणि तिच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या गीतांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. वाद्यांच्या सुरेल साथीने सादर झालेल्या भक्तिगीतांवर भाविक तल्लीन झाले होते. प्रत्येक गीताला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. 'जय माता दी'च्या गजराने मंदिर परिसरातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमात भाविकांनी देवीच्या भक्तिगीतांचा मनमुराद आनंद लुटला.

दिव्यांगांचा सन्मान, स्वावलंबन आणि सक्षमीकरणाचा जागर



अहिल्यानगर : प्रत्येक पावलात सन्मान, प्रत्येक संधीमध्ये समानता आणि प्रत्येक स्वप्नाला भरारी घेण्याची संधी! या प्रेरणादायी विचाराला केंद्रस्थानी ठेवून अहिल्यानगर येथे जागतिक पांढरी काठी दिन २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दृष्टिबाधित व्यक्तींच्या स्वावलंबनाला प्रोत्साहन देणे, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देणे आणि समाजामध्ये समानता व समावेशकतेची भावना दृढ करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. दिव्य दृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, तज्ज्ञ आणि दिव्यांग बांधव सहभागी झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर समान संधी, योग्य मार्गदर्शन आणि स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक पाठबळ देण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी धनश्रीताई विखे पाटील, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, ब्रिगेडियर राजीव चावला, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, उपअधीक्षक शिरीष वमने, बँक ऑफ बडोदाचे मनीष कुमार, हरजीतसिंग वधवा, दिव्य दृष्टी संस्थेचे कृष्णा तवले, मुख्य कार्यकारी अधिकारीसुमन कुरेल आदी उपस्थिती होते.

आ. पवारांनी केली कर्जतच्या दुष्काळी परिस्थितीची पाहणी

साधला सर्वसामान्य शेतकऱ्यांशी संवाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेतकऱ्यांना केवळ ५ हजाराची मदत देत सरकार चेष्टा करतंय का ? आ. पवार

जाहिरातींवर कोट्यवधींची उधळपट्टी करणारं हे राज्यातील महायुती सरकार दुष्काळी परिस्थितीत ५ हजार रुपयांचं चॉकलेट शेतकऱ्यांच्या हातावर टेकवताना सरकारला लाज कशी वाटत नाही ? असा सवाल आमदार रोहित पवारांनी उपस्थित केला. दुष्काळाच्या आगीत शेतकरी होरपळून निघत असल्याने शेतकऱ्यांना हेक्टरी किमान १ लाख रुपये, तर शेतमजुरांना २५ हजार रुपये मदत देण्याची मागणी आमदार पवारांनी केली. विद्यमान सरकार अग्रीम रक्कम म्हणून केवळ ५ हजार रुपयांवर शेतकऱ्यांची बोळवण करीत आहे. नेत्यांच्या आणि मंत्र्यांच्या एका चहापानाचा खर्चही यापेक्षा कितीतरी मोठा आहे. आज शेतीचा मशागत खर्च हेक्टरी ३० ते ५० हजार रुपयांवर गेलाय याचे भान सरकारने ठेवावं.

कर्जत : ऑक्टोबर महिन्यातच कर्जत तालुक्यातील बहुतांश भागात दुष्काळाने अत्यंत अक्राळ-विक्राळ रूप दाखविण्यास सुरुवात केली आहे. अजून मान्सून सक्रीयतेसाठी सात-आठ महिन्यांचा अवधी बाकी असून सर्वसामान्य शेतकरी हवालदिल झाला आहे. २०१२-१३ साली सरकारने शेतकऱ्यांना तातडीने अनुदान उपलब्ध करुन दिले होते. त्याप्रमाणे महायुती सरकारने ठोस पावले उचलावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली. शुक्रवारी आमदार पवारांनी कर्जतच्या दुष्काळी भागाची पाहणी करीत शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावर्षी मान्सून पावसाने चांगलाच दगा दिला. ऑक्टोबर महिन्यातच कर्जत तालुक्यातील बहुतांश भागात दुष्काळी परिस्थितीने आपले रूप दाखविण्यास सुरुवात केली आहे. नैसर्गिक पाण्याचे जलसरोत कोरडेठाक पडले असून काही ठिकाणी अल्प पाणीसाठा दिसत आहे. पाण्यावाचून पिके जळाली आहेत. तर पशुधनाच्या चाऱ्याची तीच अवस्था उभी राहिली आहे. फळबागा विना पाणी सुकून चालल्या असून सर्वसामान्य शेतकऱ्यास अगोदर लहरी निसर्गाने मारले. तर दुसरीकडे शासनाच्या उपाय-योजना तोकड्या ठरत असल्याने तालुक्यातील शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. याच अनुषंगाने आमदार रोहित पवार यांनी शुक्रवार, दि १६ ऑक्टोबर रोजी कर्जत तालुक्यातील दुष्काळी भागाची पाहणी करीत सर्वसामान्य शेतकऱ्यांशी संवाद साधला. आमदार रोहित पवारांनी चिंचोली काळदात येथील सीताफळ आणि ड्रॅगन फ्रुट बागेची पाहणी केली. लाखो रुपये खर्च करून जपलेल्या या फळबागा डोळ्या-देखत पाण्यावाचून सुकून चालल्या असल्याची कैफियत शेतकऱ्यांनी त्यांच्या समोर मांडली. आजच अशी अवस्था असून अजून पुढील सात-आठ महिने काय करायचं ? या लेकरांवानी जपलेल्या फळबागा कशा वाचवायच्या असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला. दुष्काळाच्या या भीषण परिस्थितीने आमची झोप उडालीय अशा भावना परिसरातील शेतकऱ्यांनी उपस्थित केल्या. यावेळी आमदार पवारांनी उपस्थित शेतकऱ्यांना हवालदिल न होता यावर योग्य उपाय-योजना अंमलात आणून स्थानिक प्रशासनाकडून तात्काळ मदत कशी उपलब्ध करता येईल याकडे नक्कीच प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.



खा. लंके यांच्या शिष्टाईनंतर वडगाव सावताळच्या बसचा मुहूर्त ठरला!

लेखी आश्वासनानंतर रवींद्र राजदेवांचे आंदोलन मागे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

टाकळी ढोकेश्वर : खामकर झापमार्गे वडगाव सावताळ येथे एसटी बस सुरू करण्याची मागणी पूर्ण होऊनही प्रत्यक्ष बससेवा सुरू होत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र राजदेव यांनी पारनेर एसटी आगाराच्या प्रशासकीय कार्यालयात सुरू केलेल्या बैठे आंदोलनाला अखेर यश आले आहे. खासदार नीलेश लंके यांनी या प्रश्नात मध्यस्थी करत शिष्टाई केल्यानंतर पारनेर आगार व्यवस्थापनाने १९ ऑक्टोबर पासून पारनेर-वडगाव सावताळ (खामकर झापमार्गे) बस नियमितपणे सुरू करण्याचे लेखी



आश्वासन दिले आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला अखेर मुहूर्त मिळाला आहे.

खामकर झापमार्गे वडगाव सावताळ येथे एसटी बस सुरू करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाली होती. शालेय विद्यार्थ्यांची यादीही आगाराला प्राप्त झाली होती. असे असतानाही प्रत्यक्ष बस गावात पोहोचत नसल्याने ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये नाराजी होती. या प्रश्नासाठी रवींद्र राजदेव यांनी यापूर्वीही पाठपुरावा केला होता. मात्र, आश्वासनानंतरही बससेवा सुरू न झाल्याने या प्रकरणात राजकारण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रशासनाने निर्णय घेऊनही अंमलबजावणी का केली जात नाही, असा सवाल उपस्थित करत राजदेव यांनी नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष युवराज खिलारी यांच्यासह पारनेर आगाराच्या प्रशासकीय कार्यालयात बैठे आंदोलन सुरू केले. मोहन रोकडे व इतर सहकारी यावेळी उपस्थित होते. खासदार नीलेश लंके यांनीही या प्रकरणात मध्यस्थी करत आगार व्यवस्थापनाशी चर्चा केली. त्यांच्या शिष्टाईनंतर बससेवा सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय झाला आणि आगार व्यवस्थापकांनी अधिकृत पत्राद्वारे तारीख निश्चित केली.

श्री क्षेत्र भावीनीमगाव येथे जगदंबा मातेचा आज यात्रोत्सव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शहरटाकळी : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी या गजबजलेल्यागावापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेले श्री क्षेत्र भाविनीमगाव हे गाव. या ठिकाणी जगदंबा माता देवीचे सातशे वर्षांपूर्वीचे भव्य दिव्य असे पुरातान हेमाडपंथी मंदिर असून जगदंबा माता देवीची भव्य अशी मूर्ती आहे. या देवीला माहूरची रेणुका, तर कुणी जगदंबा म्हणून संबोधतात. पुरातन काळात असलेल्या या मंदिराची उभारणी हेमाडपंथी पंद्धतीची असून मंदिर स्थापत्य शास्त्राचा एक आदर्श नमुना व वास्तुकलेचा एक अनमोल असा अलंकार आहे. जगदंबा मातेचे हे मंदिर आजही सुस्थितीत असून हिंदू संस्कृतीचे अनमोल असे भूषण आहे. मंदिरालागताच पुरातन भव्य बारव असून तिला ऐतिहासिक महत्व प्राप्त आहे. अहिल्यादेवी होळकरांनी जगदंबा देवी मंदिराचा जीर्णो द्वार केल्याचा दाखला मिळतो गावचा उल्लेख नवनाथ ग्रंथात भामानगर असा आढळतो तर देवीच्या नावावरून भाविनीमगावची ओळख महाराष्ट्रभर देवीनिमगाव अशी आहे.



चार वर्षांपासून फरार आरोपी बेलवंडी पोलिसांच्या जाळ्यात!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

बेलवंडी : कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेतील कर्जदारांकडून हप्त्यांची रक्कम वसूल करून ती बँकेत जमा न करता लाखोंचा अपहार केल्याप्रकरणी ४ वर्षांपासून फरार असलेल्या सागर तुळशीराम शिंदे (रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) याला बेलवंडी पोलिसांनी अटक केली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली.

कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेचे व्यवस्थापक संजय रघुनाथ भंडारे यांच्या फिर्यादीवरून एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सागर शिंदे आणि गोविंद बबन गाडे (रा. कांबी, ता. शेवगाव) हे दोघे बँकेत कलेक्शन एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत होते. मे २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत त्यांनी विविध कर्जदारांकडून कर्जाच्या हप्त्यांची रक्कम रोख स्वरूपात वसूल केली.



मात्र, ही रक्कम बँकेत जमा न करता परस्पर वापरल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात दोघांनी मिळून एकूण ७ लाख ३१ हजार ९२० रुपयांचा अपहार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यापैकी सागर शिंदे याच्याशी संबंधित ३ लाख ३८ हजार ७३० रुपयांच्या अपहाराचा आरोप आहे. याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ४०९, ४२० व ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर सागर शिंदे हा फरार होता. त्याचा शोध सुरू असताना बेलवंडी पोलिसांना त्याच्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. सदरची यशस्वी व धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हे. कॉ. दादासाहेब क्षीरसागर, पो. हे. कॉ.भाऊसाहेब यमगर,पो. हे. कॉ. गाडीलकर, पोलीस कॉ.विनोद पवार यांच्या पथकाने केली.

बाळूमामांच्या नावानं चांगभलं! जयघोषाने कोरडगाव दुमदुमले!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

कोरडगाव : 'बाळूमामांच्या नावानं चांगभलं!' या जयघोषाने आसमंत दुमदुमला, ढोल-ताशांच्या गजराने गावातील वातावरण भक्तिमय झाले, महिलांच्या डोक्यावरील कलश आणि तुळशीवृंदावनाने पालखी सोहळ्याची शोभा अधिकच खुलली, तर पारंपरिक फुगडीच्या फेराने भक्तीला उत्साहाची जोड मिळाली. अशा मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात कोरडगाव येथे श्री बाळूमामांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने संपन्न झाला. या सोहळ्यामुळे संपूर्ण गावात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांसह भाविकांनी बाळूमामांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

कोरडगाव येथे सकाळी नऊ वाजता श्री बाळूमामांची विधिवत आरती करण्यात आली. आरतीच्या वेळी भाविकांनी भक्तिभावाने बाळूमामांच्या चरणी नतमस्तक होत सुख, समृद्धी, समाधान आणि भरभराटीसाठी प्रार्थना केली. आरतीनंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि 'बाळूमामांच्या नावानं चांगभलं!' या जयघोषात पालखीची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

पालखीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. पालखी मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ढोल-ताशांच्या निनादाने आणि बाळूमामांच्या जयघोषाने गावातील वातावरण भारावून गेले. श्रद्धा, भक्ती आणि उत्साह यांचा अनोखा संगम या वेळी अनुभवायला मिळाला.

या पालखी सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरल्या त्या महिला भगिनी! डोक्यावर कलश आणि तुळशीवृंदावन घेऊन महिला भगिनी मोठ्या भक्तिभावाने पालखीच्या मिरवणुकीत सहभागी झाल्या. पारंपरिक वेशभूषा, डोक्यावरील कलश आणि तुळशीवृंदावन यामुळे मिरवणुकीला धार्मिक आणि सांस्कृतिक सौंदर्य लाभले.



महिला भगिनींनी पारंपरिक फुगडी खेळत पालखी सोहळ्यात उत्साहाची भर घातली. त्यांच्या फुगडीच्या फेराने आणि भक्तिमय सहभागाने वातावरण अधिकच प्रसन्न झाले. बाळूमामांवरील अढळ श्रद्धा व्यक्त करत महिला भगिनींनी या धार्मिक परंपरेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

गावातील रस्त्यांवरून मार्गक्रमण करणाऱ्या पालखीचे ग्रामस्थांनी भक्तिभावाने स्वागत केले. बाळूमामांच्या दर्शनासाठी भाविकांची उत्सुकता आणि जयघोषातील उत्साह यामुळे सोहळ्याला विशेष रंगत आली.

कोरडगावमधील गावातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीनंतर महिला भगिनी आणि भाविकांनी पालखीला गावाच्या शिवरस्त्यापर्यंत भक्तिभावाने वाटेला लावले. बाळूमामांच्या जयघोषात पालखीला निरोप देताना भाविकांच्या चेहऱ्यावर श्रद्धा आणि समाधानाचे भाव दिसून आले.

श्रीगोंदा नगरपरिषदेत सत्ताधाऱ्यांतच धुसफूस!

भाजप 'तुपात', शिवसेना 'वडापाव वर'?

ठेकेदारांकडून शिवसेना नगरसेवकांना दमबाजी केल्याचा अनिल औटी यांचा आरोप; ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : राज्यात भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची युती सत्तेत असताना श्रीगोंदा नगरपरिषदेत मात्र या युतीतील घटक पक्षांमध्येच समन्वयाचा अभाव असल्याचा आरोप पुढे आला आहे. भाजपच्या नेत्यांकडून शिवसेनेच्या नगरसेवकांना विकासकामांच्या प्रक्रियेत विश्वासात घेतले जात नसल्याची तक्रार असून, त्यातच रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून नगरसेवकांना दमबाजी केल्याचा गंभीर आरोप शिवसेनेचे नगरसेवक अनिल महाराज औटी यांनी केला आहे. त्यामुळे नगरपरिषदेतील सत्ताधारी गोटातील अंतर्गत नाराजी उघड होण्याची चिन्हे आहेत.

अनिल औटी यांच्या आरोपानुसार, श्रीगोंदा नगरपरिषदेत शिवसेनेच्या नगरसेवकांना विचारात न घेता विविध कामे सुरू आहेत. रस्त्याचे काम करणारे ठेकेदार संकेत गाडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांकडून नगरसेवकांना दमबाजी केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे आणि ठेकेदारांना योग्य ती



तंबी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणात योग्य निर्णय न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही औटी यांनी दिला आहे.

या घडामोडींमुळे अनिल औटी, अनिता औटी, सुशील शिंदे, बंटी बोरुडे, पल्लवी पोटे, दिपाली बोरुडे, भामाबाई कोथिंबीरे, अख्तरभाई शेख आणि श्रीकृष्ण धुमाळ या शिवसेनेच्या नगरसेवकांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. युती राज्यात एकत्र असली, तरी स्थानिक पातळीवर विकासकामांचे निर्णय, नगरसेवकांचा सहभाग आणि ठेकेदारांवरील नियंत्रण या मुद्द्यांवरून नाराजी असल्याचे चित्र औटी यांच्या आरोपांतून समोर आले आहे.

निवडणुकीतील एकजूट, सत्तेत मात्र दरी?

निवडणुकीच्या काळात एकत्रितपणे काम करणाऱ्या सत्ताधारी गटातील नगरसेवकांमध्येच आता समन्वयाचा प्रश्न उपस्थित होत आहे. भाजपच्या नगरसेवकांना निर्णयप्रक्रियेत अधिक महत्त्व मिळत असल्याची, तर शिवसेनेच्या नगरसेवकांना दुय्यम वागणूक मिळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे 'भाजप तुपात, शिवसेना वडापाववर' अशी उपरोधिक चर्चा नगरपरिषदेच्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

मात्र, ठेकेदाराकडून दमबाजी झाल्याचा आरोप आणि नगरसेवकांना विश्वासात घेतले जात नसल्याच्या तक्रारींची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. संबंधित ठेकेदार, भाजपचे पदाधिकारी आणि नगरपरिषद प्रशासन यांची या आरोपांवरील भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. या प्रकरणात प्रशासन काय भूमिका घेते आणि सत्ताधारी युतीतील मतभेद मिटवण्यासाठी काय पावले उचलली जातात, याकडे श्रीगोंदेकरांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

शनिवार, दि.१७ ऑक्टोबर २०२६ । पान ८

२० वर्षांनंतर कोपरगावच्या मुलींचा व्हॉलीबॉल संघ राज्यस्तरावर !

गौतम पब्लिक स्कूलच्या मुलींची विभागीय स्पर्धेत बाजी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : गौतम पब्लिक स्कूलच्या १४ वर्षांखालील मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने विभागीय स्पर्धेत विजेतेपद मिळवत राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत धडक मारली आहे. तब्बल २० वर्षांनंतर कोपरगाव तालुक्यातील मुलींच्या व्हॉलीबॉल संघाला राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे. नोव्हेंबरमध्ये रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत हा संघ पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. याचबरोबर शाळेच्या १४, १७ आणि १९ वर्षांखालील हॉकी संघांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत विजेतेपद मिळवत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत १५ ऑक्टोबर रोजी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे १४ वर्षांखालील मुलींच्या विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा झाल्या. गौतमच्या संघाने उपांत्यपूर्व सामन्यात पुणे ग्रामीण संघाचा १५-४ असा पराभव केला. उपांत्य सामन्यात सोलापूर ग्रामीण संघावर २५-५ अशी मात करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात पुणे ग्रामीण संघाला २५-१६ असे पराभूत करून गौतमच्या मुलींनी विजेतेपद पटकावले.

हॉकीच्या जिल्हास्तरीय स्पर्धेतही गौतम पब्लिक स्कूलच्या संघांनी आपली चमक दाखवली. १४ वर्षांखालील गटात सोनईच्या यश अकॅडमीचा ३-०, तर १७ वर्षांखालील गटातही याच संघाचा ३-० असा पराभव केला. १९ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात संगमनेर महाविद्यालयाच्या संघावर ३-० अशी मात केली. या तिन्ही संघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी व्हॉलीबॉल संघाचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी आमदार अशोकराव काळे, सचिव चैतालीताई काळे, संस्थेचे निरीक्षक नारायण बारे, संचालक मंडळाचे सदस्य आणि प्राचार्य नूर शेख यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

विविध क्रीडा प्रकारांत गौतमची भरारी

गौतम पब्लिक स्कूलने हॉकीमध्ये सातत्याने वर्चस्व राखले आहे. आता हॉकीबरोबरच क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल आणि कुस्ती अशा विविध क्रीडा प्रकारांतही शाळेचे विद्यार्थी यश मिळवत आहेत. प्राचार्य आणि क्रीडा शिक्षकांच्या मेहनतीमुळे खेळाडूंना राज्यस्तरावर पोहोचण्याची संधी मिळत असल्याचे संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे यांनी सांगितले.

शिर्डीत रोडवर उभ्या कारमध्ये आढळला बेपत्ता युवकाचा मृतदेह

मृत्यू की घातपात चर्चेला उधाण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : पुण्याहून शिर्डीत भाडे घेऊन आलेल्या एका युवकाचा मृतदेह त्यांच्याच इनोव्हा कारमध्ये आढळल्याने शिर्डी शहरात खळबळ उडाली आहे. बाळासाहेब माधवराव वावरे (वय ४९, रा. पुणे) असे मृत चालकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, वावरे हे १३ ऑक्टोबर रोजी एमएच१२एनबी०६६६ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची टोयोटा इनोव्हा क्रिस्टा गाडीने प्रवासी वाहतूक करत शिर्डीतील मधुरम हॉटेलजवळ सोडण्यासाठी आले होते. त्यानंतर पत्नीशी त्यांच १४ रोजी झालेला त्यांचा संपर्क हाच शेवटचा ठरला आणि त्यांचा मोबाईल बंद झाला.

संपर्क न झाल्याने कुटुंबीयांनी पुणे पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी मोबाईल ट्रॅक केला असता लोकेशन शिर्डीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार कुटुंबीयांनी शिर्डीत शोध घेतला असता सन अँड सॅन्ड रोडवर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या त्यांच्याच गाडीच्या मधल्या सीटवर त्यांचा मृतदेह आढळला.

सुमारे तीन दिवस मृतदेह गाडीतच असल्याने कुजलेल्या अवस्थेत होता. घटनेची माहिती मिळताच शिर्डी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. हा आकस्मिक मृत्यू आहे की घातपात, याचा अधिक तपास शिर्डी पोलीस करत असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होणार आहे.

साकूर येथे विजेच्या खांबांवर काम करताना तरुणाचा मृत्यू; एक जखमी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील साकूर येथे विजेचे खांब बसविण्याचे काम सुरू असताना विजेचा धक्का लागून १८ वर्षीय मणियार हण्या वडवी (रा. जुगणी, ता. वडगाव, जि. नंदुरबार) या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेत आणखी एक जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेमुळे विद्युत कामांच्या सुरक्षिततेचा आणि संबंधित कामासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साकूर येथे विजेचे खांब बसविण्याचे काम सुरू असताना हा अपघात घडला. या कामादरम्यान विजेचा धक्का लागल्याने तरुणाचा मृत्यू झाला, तर अन्य एक जण जखमी झाला. मात्र, ही दुर्घटना नेमकी कोणत्या परिस्थितीत घडली, काम सुरू करण्यापूर्वी वीजपुरवठा बंद करण्यात आला होता का आणि कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आली होती का, याबाबत सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे.

संबंधित कामासाठी महावितरणची पूर्वपरवानगी घेतली होती का, हा या घटनेतील महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. संबंधित कामाला परवानगी दिलेली नसल्याचा दावा केला जात आहे. हा दावा अधिकृत कागदपत्रांच्या आधारे तपासणे आवश्यक असून, कामाची जबाबदारी कोणाकडे होती आणि विद्युत सुरक्षेच्या नियमांचे पालन झाले होते का, याची पडताळणी होणे गरजेचे आहे.

विजेच्या खांबांवर किंवा विद्युत वाहिन्यांजवळ काम करताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आणि संबंधित नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असते. या घटनेत कामगारांकडे सुरक्षा साधने (सेफ्टी किट) होती का, त्यांना सुरक्षिततेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या का आणि कामावर देखरेख ठेवण्यासाठी जबाबदार अधिकारी उपस्थित होते का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

या घटनेप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी करून नेमकी कारणे स्पष्ट करावीत, कामासाठी आवश्यक परवानग्या व सुरक्षा उपाययोजनांची तपासणी करावी आणि निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी होत आहे.

महावितरणच्या विद्युत अपघात भरपाई माहिती फलकाची श्रीरामपूरला वानवा

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : विद्युत अपघातात नागरिकाचा मृत्यू झाल्यानंतर संबंधित कुटुंबीयांना उपलब्ध असलेल्या आर्थिक मदतीची माहिती फलकाची श्रीरामपूर तालुक्यात महावितरण कार्यालयात सर्वत्र वानवा आहे. महावितरणच्या प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३३, दिनांक ९ मार्च २०१६ नुसार कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त मानवाच्या जीवितास झालेल्या जीवघेण्या विद्युत अपघातासाठी देण्यात येणारी आर्थिक मदत २ लाखांवरून ४ लाख रुपये करण्यात आली आहे.

विद्युत अपघातानंतर एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतो. त्या कुटुंबाला उपलब्ध असलेल्या अधिकृत आर्थिक मदतीची माहिती मिळविण्यासाठी कार्यालयीन हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये. महावितरणने ही माहिती पारदर्शकपणे कार्यालयाच्या दर्शनी भागात उपलब्ध करून द्यावी.

साहेबराव वाबळे, बेलापूर

ही तरतूद संचालक मंडळाच्या ठराव क्र. ५९०, दिनांक १२ जानेवारी २०१६च्या अनुषंगाने करण्यात आली होती. या महत्त्वाच्या आर्थिक मदतीची माहिती सर्वसामान्य नागरिकांना कार्यालयीन पातळीवर सहज आणि ठळकपणे उपलब्ध नसेल, तर अपघातानंतर आधीच संकटात असलेल्या कुटुंबीयांना भरपाईची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, दावा प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क याबाबत अडचणी निर्माण होऊ शकतात.

त्यामुळे प्रत्येक महावितरण कार्यालयात विद्युत अपघातातील आर्थिक मदत - नागरिकांसाठी माहिती या शीर्षकाचा स्वतंत्र माहितीफलक लावण्यात यावा. त्यावर परिपत्रक क्रमांक व दिनांक, उपलब्ध आर्थिक मदतीची तरतूद, लागू अटी, दावा करण्याची प्राथमिक प्रक्रिया, संबंधित अधिकारी, कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक आणि अधिकृत ई-मेल यांची माहिती स्पष्टपणे देण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

राशीनमध्ये कोयत्याचा धाक दाखवून जबरी चोरी । मुख्य आरोपी जेरबंद; फरारी तिघांचा शोध सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राशीन : राशीन येथील राऊतवस्तीमध्ये पहाटेच्या सुमारास घरात घुसून कोयत्याचा धाक दाखवत जबरी चोरी करणाऱ्या प्रकरणात कर्जत पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत मुख्य आरोपीला अटक केली आहे. राजुऱ्या उर्फ राजू सुलाख्या चव्हाण (रा. कोरेवस्ती, भांबोरा, ता. कर्जत) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या गुन्ह्यात अन्य तीन साथीदारांचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, १० ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे सुमारे दोन वाजता चंद्रकला विलास राऊत यांच्या राऊतवस्ती येथील घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश केला. घरातील मुलांच्या बेडरूमला बाहेरून कड्या लावून, घराजवळ पडलेली शिडी उभी करत आरोपींनी बेडरूमचा दरवाजा उघडला.

त्यानंतर फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याची मंगळसूत्रासह मण्यांची पोत ओढून नेली. कानातील दागिने काढण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादी यांनी प्रतिकार केला. यावेळी आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. देवघरातील मधुआईची दोन ग्रॅम वजनाची सोन्याची मूर्तीसह सोन्याचे दागिने असा सुमारे १ लाख २ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या मुलांचे मोबाईल फोनही बळजबरीने नेऊन त्यांची मोडतोड केली. या प्रकारामुळे सुमारे दोन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्हा दाखल होताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर, पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड आणि तपास पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करण्यात आला.

त्यातून राजुऱ्या उर्फ राजू चव्हाण



याच्यासह अन्य तीन साथीदारांनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुख्य आरोपीला ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. गुन्हा करताना कोयत्याचा वापर करून फिर्यादीला धमकावल्याने भारतीय न्याय संहितेच्या कलम ३११ ची वाढ करण्यात आली आहे. चोरीचा मुद्देमाल हस्तगत करणे आणि इतर साथीदारांचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या पथकात पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब मुळीक, सफौ आण्णासाहेब चव्हाण, पोहेकॉ प्रविण सुतार, पोलीस कर्मचारी विशाल क्षिरसागर, अमोल रायकर, किरण बोराडे, प्रकाश दंदाडे, अर्जुन पोकळे, गोविंद हिंगे, मनोज मुरकुटे, चांगदेव कुमटकर, सचिन झुनगुरे, योगेश सुपेकर, नितीन धस, अरुण सांगळे आणि राहुल गुंड यांच्यासह मोबाईल सेल अहिल्यानगरचे कर्मचारी तसेच होमगार्ड अनिकेत जंजीरे, निलेश देवडे, अक्षय जगदाळे आणि हर्षल गावडे सहभागी होते.

गंभीर जबरी चोरीच्या गुन्ह्यात गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे मुख्य आरोपीला अटक करण्यात कर्जत पोलिसांना यश आले आहे. पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक होत असून, उर्वरित आरोपींचा शोध आणि चोरीच्या मुद्देमालाची वसुली याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वाघाच्या आखाड्यात पाणीप्रश्नी महिला आक्रमक; ग्रामस्थांचा पंचायत समितीत राडा

उपोषणाचा पाचवा दिवस; प्रवेशद्वार बंद करून अधिकाऱ्यांना घेराव, पाणीप्रश्न सोडविण्याची मागणी

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील वाघाचा आखाडा येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सुरू असलेल्या उपोषणाचा पाचवा दिवस उजाडूनही प्रशासनाकडून ठोस तोडगा न निघाल्याने ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर संतप्त झाले आहेत. संतप्त ग्रामस्थांनी राहुरी पंचायत समितीत धडक देत आक्रमक भूमिका घेतली. पंचायत समितीचे मुख्य प्रवेशद्वार आणि कार्यालयाचे दरवाजे बंद करून अधिकाऱ्यांना घेराव घातल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

वाघाचा आखाडा येथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी



उपोषण सुरू केले आहे. मात्र, पाच दिवस उलटूनही पाणीप्रश्नावर ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांचा संयम सुटला. त्यातूनच संतप्त ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयात जाऊन प्रशासनाला जाब विचारला.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी करत ग्रामस्थांनी पंचायत समितीचे मुख्य प्रवेशद्वार आणि कार्यालयाचे दरवाजे बंद केले. जोपर्यंत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत एकाही अधिकाऱ्याला घरी जाऊ देणार नाही, असा आक्रमक इशारा आंदोलकांनी दिला. या आंदोलनामुळे पंचायत समिती परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

महिला सरपंचांची प्रकृती खालावली !

पाण्याच्या प्रश्नावर अद्याप तोडगा निघालेला नसतानाच, उपोषणकर्त्या महिला सरपंच निर्मला कटारे (वय ६०) यांची गुरुवारी रात्री प्रकृती खालावली. त्यामुळे त्यांना शासकीय रुग्णवाहिकेतून तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

वाघाचा आखाडा येथील पाणीप्रश्न अद्याप सुटत नसल्याबद्दल ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दोन आमदार, एक खासदार आणि पालकमंत्री असे लोकप्रतिनिधी असतानाही गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी उपोषण करावे लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. विकासाच्या घोषणा केल्या जात असताना मूलभूत गरज असलेल्या पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

पिण्याचे पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून, त्यासाठी ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागणे ही गंभीर बाब आहे. उपोषणाचा पाचवा दिवस उजाडूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन वाघाचा आखाडा येथील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करणार का, याकडे ग्रामस्थांसह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

